मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३३ ■ मंगळवार, ०५ मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# भारतीय जनता पार्टीची बंगालमध्ये मोठी झेप

- ममता बॅनर्जी यांच्या TMC ला मोठा धक्का
- १५ वर्षांच्या सत्तेविरोधातील नाराजी,
- भ्रष्टाचाराचे आरोप आणि स्थानिक असंतोषाचा निवडणुकीत फटका




**वृत्तसंस्था :** ४ मे २०२६ रोजी जाहीर झालेल्या पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या निकालांमध्ये ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसताना दिसत असून, मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारविरोधातील नाराजी मतपेटीतून स्पष्ट झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. ताज्या कलांनुसार भारतीय जनता पार्टीने १९० हून अधिक जागांवर आघाडी घेत बहुमताचा टप्पा सहज पार केल्याचे चित्र दिसत आहे. सलग १५ वर्षे सत्तेत राहिल्यानंतर तृणमूल काँग्रेसविरोधात निर्माण झालेली सत्ताविरोधी लाट ही या निकालामागील प्रमुख कारण मानली जात आहे. राज्यातील अनेक मतदारसंघांमध्ये ‘बदल हवा’ ही भावना तीव्र झाल्याचे मतदानाच्या ट्रेंडमधून स्पष्ट झाले. गेल्या काही वर्षांत शिक्षक भरती घोटाळ्यासारख्या प्रकरणांमुळे सरकारवर गंभीर भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते. विशेषतः मध्यमवर्गीय, बेरोजगार युवक आणि शिक्षित मतदारांमध्ये या मुद्द्यांवरून नाराजी वाढत गेल्याचे विश्लेषकांचे मत आहे. यामुळे तृणमूल काँग्रेसची ‘स्वच्छ प्रशासन’ ही प्रतिमा मोठ्या प्रमाणात मलिन झाली असल्याचे मानले जात आहे. याशिवाय स्थानिक पातळीवरील तृणमूल नेत्यांची कथित अरेरावी, सिंडिकेट राज आणि वाढत्या गुंडगिरीच्या तक्रारींनीही मतदारांमध्ये असंतोष निर्माण केला होता. निवडणुकीदरम्यान केंद्रीय सुरक्षा दलांची मोठ्या प्रमाणावर तैनाती झाल्याने सामान्य मतदारांनी निर्भयपणे मतदान केल्याचे बोलले जात आहे. अनेक राजकीय विश्लेषकांच्या मते, यामुळे आतापर्यंत दबावाखाली राहिलेला विरोधी मतदार यावेळी उघडपणे मतदानासाठी बाहेर पडला. महिलांच्या सुरक्षेशी संबंधित काही घटनांवर सरकारने घेतलेली बचावात्मक भूमिका आणि उशिरा दिलेला प्रतिसाद याचाही महिला मतदारांवर परिणाम झाल्याचे मानले जात आहे. तसेच मतदार याद्यांमधून नावे वगळल्याच्या आरोपांवरूनही मोठा वाद निर्माण झाला होता. या सर्व मुद्द्यांचा एकत्रित परिणाम निवडणुकीच्या निकालांमध्ये दिसून आल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. दुसरीकडे भाजपने आक्रमक प्रचार, संघटनात्मक ताकद आणि केंद्रातील नेतृत्वाचा प्रभाव याच्या जोरावर बंगालमध्ये मोठी मुसंडी मारत राज्याच्या राजकारणात ऐतिहासिक यश मिळवल्याचे चित्र सध्या समोर येत आहे.

> “ममतादीदी तुम्ही कितीही अत्याचार केला तरी भाजपच्या कार्यकर्त्यांना थांबवू शकणार नाही. आज केवळ भाजप जिंकली नाही, तर संपूर्ण भारत जिंकला आहे. आसामप्रमाणे आता बंगालही देशाच्या विकासाच्या वाटचालीत निर्णायक भूमिका बजावेल,”
> - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

> “जनतेने मतपेटीतून या टीकेला चोख उत्तर दिले आहे. आता भाजप सरकार पश्चिम बंगालच्या सर्वांगीण विकासातून त्यांना सणसणीत प्रत्युत्तर देईल,” असे शिंदे म्हणाले. त्यांनी पुढे ‘डबल इंजिन सरकार’मुळे पश्चिम बंगालमध्ये विकासाची गती वाढेल आणि राज्यात नव्या विकासपर्वाची सुरुवात होईल”
> – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## पनवेल तालुक्यात सलग दोन दिवसांत घडलेल्या दोन हत्याकांडांनी संपूर्ण परिसर हादरून गेला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यात सलग दोन दिवसांत घडलेल्या दोन हत्याकांडांनी संपूर्ण परिसर हादरून गेला असून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. रविवारी बंबई पाडा येथे एका महिलेचा संशयास्पद मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच सोमवारी उसली गावाजवळ आणखी एका तरुणाची निर्घृण हत्या झाल्याचे उघडकीस आले आहे.

रविवारी सकाळी बंबई पाडा परिसरात एका महिलेचा मृतदेह घरात आढळून आला होता. तिच्या गळयावर आढळलेल्या खुणांवरून गळा आवळून खून केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली असतानाच अवघ्या काही तासांत दुसरी धक्कादायक घटना समोर आली. सोमवारी उसली गावाजवळ सुरू असलेल्या रेल्वे पुलाच्या कामाच्या ठिकाणी दोन पिलरच्या मधोमध एका तरुणाचा मृतदेह आढळून आला. मृताची ओळख अमित राय अशी झाली आहे. विशेष म्हणजे त्यांच्या डोळयांमध्ये भोसकल्याच्या खुणा आढळून आल्याने ही हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दोन्ही घटनांची माहिती मिळताच नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर घटनास्थळी गर्दी केली असून पनवेल तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सलग दोन दिवसांत दोन खून झाल्यामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढली आहे.

पोलीस पथकांनी दोन्ही ठिकाणी पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले असून या हत्यांमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. वैयक्तिक वाद, जुने वैमनस्य किंवा इतर गुन्हेगारी कारणांचा कोन तपासात तपासला जात आहे. या प्रकरणांचा पुढील तपास पनवेल शहर पोलीस तसेच स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असून आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. सीसीटीव्ही फुटेज, मोबाईल लोकेशन आणि संशयितांची चौकशी यावर भर दिला जात आहे. सलग घडलेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे पनवेल तालुका हादरला असून नागरिकांनी तातडीने कडक पोलीस बंदोबस्त आणि गुन्हेगारीवर आळा घालण्याची मागणी केली आहे.

## शंतनू आमले यांचा गवांदे क्लासेस च्या वतीने भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**आष्टी (प्रतिनिधी)**

**बाळासाहेब रकटाटे** – आष्टी तालुक्यातील होतकरू विद्यार्थी शंतनू महादेव आमले यांनी बारावी परीक्षेत बायोलॉजी, मॅथ्स व केमिस्ट्री या विषयांत उत्कृष्ट गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या यशाबद्दल अहिल्यानगर येथील गवांदे क्लासेसच्या वतीने भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी शंतनू आमले यांचा ढगे सर सर, जावळे सर व गवांदे सर चौधरी सर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी टाळयांच्या कडकडाटात त्यांच्या यशाचे स्वागत केले. कार्यक्रमाचे वातावरण अत्यंत उत्साहपूर्ण व प्रेरणादायी होते.

शंतनू यांनी सातत्यपूर्ण मेहनत, चिकाटी व अभ्यासातील शिस्त यांच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. ग्रामीण भागातून येऊनही त्यांनी आपल्या गुणवत्तेच्या बळावर शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या यशामुळे त्यांच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या गौरव सोहळयात शंतनू यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक व मार्गदर्शक यांना दिले. नियमित अभ्यास, वेळेचे योग्य नियोजन व सकारात्मक दृष्टीकोन यामुळेच हे यश शक्य झाले, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढील शिक्षणातही अधिक प्रगती करून समाजासाठी काहीतरी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

या प्रसंगी शंतनू यांच्या कुटुंबीयांनी भावना व्यक्त करत सर्व गुरुजनांचे मनःपूर्वक आभार मानले..

कार्यक्रमास शिक्षकवर्ग, विद्यार्थी, पालक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या यशामुळे परिसरातील विद्यार्थ्यांना नवीन प्रेरणा मिळाली असून शंतनू आमले यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## पनवेलमध्ये उद्योगाभिमुख कौशल्यविकासासाठी भागीदारी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सहाय्याने कार्यरत सामाजिक विकास संस्था ईशान्य फाउंडेशनने महाराष्ट्रातील पनवेल येथील भोकरपाडा येथे प्रगत कौशल्य विकासासाठी ‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ उभारण्यासाठी नामटेक (NAMTECH) सोबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. नामटेक ही आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांनी स्थापन केलेल्या सेक्शन ८ कंपनीचा एकभाग असून, सध्या ती गुजरातमधील गांधीनगर येथे कौशल्य विद्यापीठ उभारण्याचेकामकरतआहे.‘सेंटर ऑफ एक्सलन्स’ स्थापन करण्याचा हा प्रकल्प दीपक फर्टिलायझर्सच्या कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांचा भाग असून, रोजगारक्षमता वाढवणे आणि उद्योगसिद्ध मनुष्यबळ तयार करण्यासाठी भविष्याभिमुख कौशल्य विकास परिसंस्था उभारणे हा यामागील उद्देश आहे.



हा उपक्रम दीपक फर्टिलायझर्स चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर एस. सी. मेहता, तसेच ईशान्य फाउंडेशन मॅनेजिंग ट्रस्टी पारुल मेहता यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व व मार्गदर्शनातून साकार झाला आहे. शिक्षण आणि कौशल्य विकासाद्वारे सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्यामध्ये त्यांच्या नेतृत्वाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.या तीन वर्षांच्या सहकार्याअंतर्गत, नामटेक (NAM-TECH) ईशान्य फाउंडेशनला “सेंटर ऑफ एक्सलन्स” स्थापन व कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक सल्ला आणि अंमलबजावणीसाठी मदत करणार आहे. या उपक्रमाद्वारे बेरोजगार युवकांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याबरोबरच उद्योगात काम करणाऱ्या व्यक्तींसाठी कौशल्यवृद्धी आणि पुनःकौशल्यविकास कार्यक्रमदेखील राबविण्यात येणार आहेत. पनवेलमधील भोकरपाडा येथे जुन्या मुंबई–पुणे महामार्गालगत दोन एकर जागेवर हे उत्कृष्टता केंद्र विकसित करण्यात येणार आहे. उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील बदलत्या गरजा लक्षात घेऊन कौशल्य दरी कमी करणे, उत्पादकता वाढविणे आणि रोजगार क्षमतेत सुधारणा घडविणे हा या संस्थेचा उद्देश असेल.

या उत्कृष्टता केंद्रामध्ये उत्पादन, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान क्षेत्रांतील प्राधान्यक्षेत्रे व रोजगार भूमिका निश्चित करण्यात येतील. तसेच विद्यार्थ्यांची मागणी आणि उद्योगाच्या गरजेनुसार प्रवेश क्षमतेचे नियोजन केले जाईल. आधुनिक वर्गखोल्या, प्रयोगशाळा, कार्यशाळा, नवोपक्रम केंद्रे, प्रशासकीय सुविधा, वसतिगृह, कॅफेटेरिया आणि आवश्यक पायाभूत सुविधा येथे उपलब्ध असतील. हा प्रकल्प अंदाजे ३५ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन असून, बांधकाम व टप्प्याटप्प्याने विकास नामटेकच्या तांत्रिक शिफारसी आणि जागा नियोजनानुसार करण्यात येईल. उद्योग भागीदारांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि नवोपक्रम केंद्रे विकसित केली जातील. या सामंजस्य करारावर ईशान्य फाउंडेशन तर्फे दीपक फर्टिलायझर्सचे प्रेसिडेंट कॉर्पोरेट गव्हर्नन्स नरेश पिनिसेट्टी आणि संचालक एम. पी. शिंदे यांनी तर नामटेक तर्फे महासंचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. इब्राहिम हफीजूर रहमान यांनी स्वाक्षरी केली.

## महामार्ग पोलिस केंद्र, पळस्पे (पनवेल) येथील ६ पोलिस अंमलदारांचा महासंचालक सन्मानचिन्हानें गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर, महामार्ग पोलिस केंद्र, पळस्पे (पनवेल) येथील ६ पोलिस अंमलदारांनी केलेल्या अतुलनीय आणि उत्कृष्ट सेवेची दखल घेत त्यांना मानाच्या पोलिस महासंचालक चालक सन्मानचिन्हानें गौरवण्यात आले. महामार्ग सुरक्षा पथकातील अंमलदारांनी आणीबाणीच्या प्रसंगी दाखवलेली तत्परता आणि निष्ठेबद्दल हा बहुमान देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. सन्मानित करण्यात आलेल्यांमध्ये सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक मनोज चौधरी, पोलिस हवालदार विनोद भोईर, निलेश चव्हाण, सचिन पवार, अमित परदेशी, किरण महाजन या सहा अंमलदारांचा समावेश आहे. पळस्पे येथील महामार्ग पोलिस केंद्रात आयोजित एका विशेष कार्यक्रमात, अपर पोलिस महासंचालक (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, प्रवीण साळुंके यांच्या हस्ते या सहा अंमलदारांना सन्मानचिन्ह बहाल करण्यात आले. सन्मानित करण्यात आलेल्या या सहा पोलिस अंमलदारांनी आपल्या प्रदीर्घ सेवेदरम्यान शिस्तबद्ध आणि प्रामाणिक कामाचा ठसा उमटवला आहे. केवळ कर्तव्यपालनच नव्हे, तर महामार्ग पोलिस दलात कार्यरत असताना, भीषण अपघातांच्या प्रसंगी तत्परतेने धाव घेऊन, जखमींना वेळेत मदत मिळवून देत अनेकांचे प्राण वाचवण्याचे मोलाचे कार्य त्यांनी केले आहे. या सोहळ्याप्रसंगी पोलिस अधीक्षक, महामार्ग सुरक्षा पथक रायगड परिक्षेत्र, तानाजी चिखले, पोलिस उपअधीक्षक पुष्पलता दिघे, पोलिस निरीक्षक भरत शेंडगे आणि म.पो. केंद्र पळस्पेचे प्रभारी अधिकारी वैभव रोंगे उपस्थित होते.



# कामोठ्यात 'अस्मिता महाराष्ट्राची'; दिशा व्यासपीठाच्या १०० उपक्रमांचा उत्सव संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणाऱ्या दिशा व्यासपीठाने १०० यशस्वी उपक्रमांचा गौरवशाली टप्पा यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या ऐतिहासिक कामगिरीचे औचित्य साधून आणि 'महाराष्ट्र दिना'चे निमित्त साधून कामोठे येथील राधाई स्कूलमध्ये अस्मिता महाराष्ट्राची हा विशेष सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या दिमाखदार सोहळ्यात रॉयल महाराष्ट्र रनवे'आणि रॉयल महाराष्ट्र गौरव सोहळा' चे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्राची समृद्ध लोककला आणि ऐतिहासिक वैभव यांचा सुरेख संगम यावेळी उपस्थितांना अनुभवायला मिळाला.













कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या 'रॉयल महाराष्ट्र रनवे'वर बालकलाकार आणि महिलांनी महाराष्ट्राच्या लोककलेचे बहारदार सादरीकरण केले. पारंपरिक आणि ऐतिहासिक महाराष्ट्रीयन पोशाख परिधान करून या कलाकारांनी राज्याच्या संस्कृतीचे दर्शन घडवले. ऐतिहासिक वारसा आणि आधुनिक सादरीकरण यांचा संगम या सोहळ्याचे वेगळेपण ठरले.या सोहळ्याचे आणि पुरस्कारांचे अनावरण विधानपरिषद आमदार मा. विक्रांतदादा पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील ,मा. विमल बिडवे (पोलीस निरीक्षक, कामोठे), इंदू झा, भूषण अरुणा अजित पोवळे, यांच्या हस्ते करण्यात आले. आमदार विक्रांतदादा पाटील यांनी संस्थेच्या प्रवासाचे कौतुक करताना सांगितले की, १०० उपक्रम यशस्वीपणे पूर्ण करणे ही सोपी गोष्ट नाही. यासाठी लागणारी जिद्द आणि सामाजिक तळमळ वाखाणण्याजोगी आहे. दिशा व्यासपीठाने समाजाप्रती असलेली आपली बांधीलकी यातून सिद्ध केली आहे.१०० उपक्रमांच्या यशस्वीतेमागे असलेल्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक कार्यकर्ते गौरव पोरवाल,डॉ. रुक्मिणी अर्जुन, डॉ. सुप्रिया वाकचौर तसेच सौ. मनिषा पाटील, सौ. जयश्री राठोड, सौ. राजश्री थोरात, मंदाकिनी पाटील, मा. जयकुमार डिगोळे, सौ. माधुरी पानसरे, सौ. अश्विनी ढोके, मा. अखिलेश जाधव, डॉ. श्वेता गजाभिये, डॉ. सुवर्णा चोपडे, सौ. निता माळी, सौ. सविता कदम, सौ. शर्वरी पाटणे, मा. देवदत्त घरत, मा. तुषार पाटील, मधुरा दंडवते, सौ. मोहिनी पुजारी, डॉ. प्रांजली वैभव अंधारे आणि मिताली म्हात्रे, माधवी म्हात्रे यांचाही गौरव करण्यात आला. सामाजिक घडामोडींचे वार्तांकन करणाऱ्या पत्रकार बांधव साहिल रेळेकर, गौरव जहागिरदार, संजय कदम, रत्नाकर पाटील, गणेश कोळी, भालचंद्र जुमलेदार, संतोष आमले, अरुणकुमार मेहत्रे आणि नितीन देशमुख, गणेश जगताप , अण्णासाहेब आहेर यांचे यावेळी आभार मानून गौरविण्यात आले.

संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा निलम आंधळे यांच्यासोबत सावलीप्रमाणे खंबीरपणे साथ देणाऱ्या उपाध्यक्ष विद्या मोहिते यांचाही आमदार साहेबांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला. दिशा व्यासपीठाच्या सदस्य वाढीसाठी मदत करणाऱ्या संख्यांचादेखील यावेळी सन्मानचिन्ह देण्यात आले. कमोठ्यातील अन्य मान्यवर देखील या उपक्रमास उपस्थित होते.यावेळी बोलताना निलम आंधळे भावूक होऊन म्हणाल्या की, हा सोहळा दिशा व्यासपीठाला योगदान देणाऱ्या सर्व व्यक्तींसाठी आहे. आजवर अनेकांचे वेगवेगळया माध्यमातून मोलाचे योगदान मिळाले आहे, त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करताना आम्हाला आत्मिक आनंद होत आहे.

# सेवा, करुणा आणि कृतज्ञेचा 'यशराज भारती सन्मान'

## भारतातील तळागाळात परिवर्तन करणाऱ्यांचा कृतज्ञता आणि आदर

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, प्रतिनिधी :** स्वतःला इतरांच्या सेवेसाठी समर्पित केले आहे, अशा व्यक्ती आणि संस्थांचा गौरव 'यशराज भारती सन्मान 2026' अंतर्गत केला जातो. अनेकदा प्रसिद्धीच्या झोतापासून दूर राहून काम करतात, तरीही तळागाळात अर्थपूर्ण बदल घडवून आणतात. हा सन्मान म्हणजे अशा व्यक्तिंप्रति व्यक्त करण्यात आलेली कृतज्ञता आणि आदर आहे, ज्या आपल्या कार्याद्वारे देशाची सामाजिक वीण सातत्याने अधिक बळकट करत आहेत. यशराज भारती सन्मान 2026चा कृतज्ञता सोहळा 3 मे रोजी सायंकाळी, मुंबई येथील एनसीपीए मधील 'जमशेद भाभा थिएटर' येथे पार पडला. या सोहळ्यानिमित्त सार्वजनिक जीवन, शैक्षणिक क्षेत्र आणि समाजातील मान्यवर एकत्र आले होते. संपूर्ण देशभरात तळागाळातील बदलांना



गती देणाऱ्या सेवाभावी वृत्तीचा आणि करुणेचा त्यांनी सामूहिकरित्या गौरव केला.

या सन्मानासाठीच्या निवड प्रक्रियेत अत्यंत काटेकोर आणि सर्वसमावेशक मूल्यमापनाचा अवलंब करण्यात आला. यामध्ये परिमाणात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही निकषांचा समावेश होता. एका स्वतंत्र आणि सन्माननीय ग्रँड ज्युरींच्या शिफारशीसह या प्रक्रियेचा समारोप झाला.

या अनोख्या कृतज्ञता समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उत्तर प्रदेशच्या राज्यपाल माननीय श्रीमती आनंदीबेन पटेल आणि नोबेल पारितोषिक विजेते प्राध्यापक अभिजीत व्ही.बॅनर्जी यांसारखे दिग्गज उपस्थित होते; तर महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य श्री. दिलीप वळसे पाटील हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. या सर्वांनी मिळून, तळागाळात असा बदल घडवून आणणाऱ्या व्यक्ती वा संस्था यांचा गौरव केला. या व्यक्तींचे समर्पण आणि कठोर परिश्रम हे समाजात कायमस्वरूपी तसेच सकारात्मक बदल घडवून आणण्यास मोलाचे योगदान देतात. या सन्मानामध्ये 'सन्मान पदक', 'सन्मान प्रशस्तिपत्र' आणि १ कोटी १ लाख रुपयांचा 'सन्मान निधी' यांचा समावेश होता.

दिनेश कुमार जैन, सल्लागार मंडळाचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, यशराज बायोटेक्नॉलॉजी लिमिटेड म्हणाले,"यशराज भारती सन्मान म्हणजे तळागाळातील लोकांसाठी निस्वार्थपणे, कोणत्याही प्रसिद्धीविना काम करणाऱ्या आणि समाजावर चिरस्थायी प्रभाव निर्माण करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांप्रति व्यक्त केलेली कृतज्ञता आहे. या प्रोत्साहनाच्या माध्यमातून, आम्ही त्यांची निष्ठा अधोरेखित करण्यासोबतच त्यांच्या कामाची माहिती अधिक लोकांपर्यंत पोहोचवणे आणि उद्देश-प्रेरित कार्याची एक व्यापक चळवळ उभी करण्यास प्रेरणा देणे, असे उद्दिष्ट बाळगून आहोत. या वर्षीच्या सन्मानार्थींचे कार्य हे करुणा, जिद्द आणि समाजाच्या पुढाकाराने घडणाऱ्या बदलांची ताकद दर्शवते.

अधिक समावेशक आणि समताधिष्ठित समाज घडवण्यासाठी हीच ताकद अत्यंत आवश्यक आहे."

# अन्यायाविरोधात दिव्यांग नागरिकाचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण

## हक्कासाठी लढतोय , पण ऐकणार कोण !

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** अप्पर जिल्हाधिकारी पुणे यांच्या आदेशाची खेडचे तहसीलदार यांनी अंमलबजावणी करून आदेश पारित केल्यानंतर खेडच्या उपविभागीय अधिकाऱ्याने तातडीने स्थगिती दिली. यामुळे खेड तालुक्यातील सायगाव येथील जमीनप्रकरणी अन्यायग्रस्त दिव्यांग नागरिक सुदाम शंकर बोरकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे उपोषण सुरू केले आहे. उपविभागीय अधिकारी,खेड यांचा आदेश १२ एप्रिल २०१६ रोजी अप्पर जिल्हाधिकारी यांनी रद्द केला होता. तहसीलदार खेड यांना फेरचौकशी आदेश दिले होते. त्यानंतर अप्पर विभागीय आयुक्त पुणे यांचेकडे स्थगिती नसतानाही नऊ वर्षे अप्पर जिल्हाधिकारी पुणे यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली




नाही. तहसीलदार खेड यांनी २५ मार्च २०२६ रोजी अप्पर जिल्हाधिकारी पुणे यांचा आदेश कायम ठेवल्याने प्रतिवादींनी खेडचे उपविभागीय अधिकारी, प्रांत यांचेकडे अपिल दाखल केले. स्थगिती दिली नाही तर जमीनीची विक्री सुदाम बोरकर व इतर करतील हा मुद्दा ग्राह्य धरून खेडचे उपविभागीय अधिकारी, प्रांत अनिल दौंडे यांनी स्थगिती दिली. वास्तविक प्रतिवादी यांनीच काही क्षेत्र यापुर्वी बेकायदा विक्री केले असून पुढील सुनावणीपर्यंत स्थगिती आदेशाचा लाभ घेऊन उर्वरित विक्री करण्याची शक्यता आहे. यामुळे दिव्यांग नागरिक सुदाम बोरकर यांनी मुंबई येथे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली, त्यांचे ओएसडी निलेश शिंगी यांनी फोन करून उपविभागीय अधिकारी, प्रांत अनिल दौंडे यांना स्थगिती आदेश रद्द करून सुनावणी घेऊन अंतिम निर्णय देण्याचे फोनवर निर्देश दिले. बोरकर यांनी उपविभागीय अधिकारी यांना अर्ज देऊनही दोन्ही बाबींची दखल न घेतल्याने जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे आंदोलन सुरू केले आहे. अप्पर जिल्हाधिकारी व अप्पर आयुक्त यांनी स्थगिती दिली नसताना वस्तुस्थिती व परिणाम याचे अवलोकन न करता उपविभागीय अधिकारी, प्रांत खेड यांनी मात्र स्थगिती देऊन अन्याय केल्याची भावना बोरकर यांनी व्यक्त केली. अन्यायाविरुद्ध दिव्यांग नागरिकाचे जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे आंदोलन सुरू असून न्याय मिळावा अशी मागणी केली आहे.

# सहा महिन्यांच्या गर्भवती महिलेस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पती व सासूला 10 वर्षे सक्तमजुरी; प्रत्येकी 35हजाराचा दंड

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** चिपळूण तालुक्यातील डेरवण येथील 6 महिने गरोदर विवाहितेचा एक लाख रुपयाच्या मागणीसाठी छळ करुन तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी चिपळूण येथील जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांनी आरोपी पती दिनेश महादेव कदम वय 34 वर्षे व सासू मिनाक्षी महादेव कदम वय 57 वर्षे या दोन्ही आरोपींना भा.दं. वि कलम 498 (अ), 306 सह 34 या गुन्ह्याखाली दोषी धरून10 वर्षे सक्तमजुरी व प्रत्येकी 35 हजार रूपये दंड व दंड न भरल्यास प्रत्येकी 6 महिने सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.

गुन्ह्याबाबत थोडक्यात हकिकत अशी की, हा गुन्हा सावर्डे पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला. त्यातील मयत काव्या दिनेश कदम वय 25 वर्षे हिने घराशेजारील विहिरीत उडी मारुन आत्महत्या केली. तिचा विवाह दिनांक 15/05/2015 रोजी आरोपी दिनेश याच्यासोबत झाला होता. विवाहनंतर सुमारे 4 महिन्यातच तिचा पती व सासू यांनी गाडीसाठी रुपये 1 लाख रुपये माहेरहून आणण्याबाबत तगादा लावला. तसेच त्या कारणावरुन मयत हिला धर्मपत्नीचा दर्जा न देता पतीने मारझोड केली व घराबाहेर काढले. घराच्या शेडमध्ये राहण्यास सांगितले

आरोपी क्र 2 सासू मिनाक्षी महादेव कदम हिने घरातील कामावरुन तसेच किरकोळ कारणावरुन सतत टोचुन बोलुन मयत हिचा वेळोवेळी मानसिक व शारीरिक त्रास देवून छळ-जाच केला. दोन्ही आरोपी मयत काव्या हिला विहिरीला पंप असताना सुध्दा हाताने पाणी काढायला लावत. खर्चाला पैसे देत नसत.1 लाख रुपयाची मागणी माहेरच्यांनी पूर्ण केली नसल्यामुळे तिला अपमानित करुन एकटीला सतत माहेरी पाठवत. त्यांच्या वादाबाबत दोन्ही नातेवाईकांच्याकरवी बैठकसुध्दा घेण्यात आल्या होत्या. परंतु, आरोपींच्या वागण्यात कोणताही फरक पडला नव्हता. गर्भवती असतानादेखील आरोपींनी वारंवार पैशाचा तगादा लावून तिचे जगणे असह्य केले. तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने तिने सासरच्या घरासमोरीलच विहिरीत गर्भवती असताना दि. 21/11/2016 रोजी उडी मारुन आत्महत्या केली.

आरोपी पती व सासूविरुध्द भा.दं. वि.सं. कलम498 (अ),306 सह 34 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पूर्ण झाल्यावर सावर्डे पोलीसांनी न्यायालयात आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले होते. या सत्र खटल्याची सुनावणी चिपळूण येथील जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांच्यासमोर सुरु होती. सरकारी वकील प्रफुल्ल साळवी यांनी एकूण ८ साक्षीदार तपासले. मयत हिची आई, भाऊ व शेजारी तसेच सावर्डा पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी शरद कुवेस्कर व सचिन इंगोले यांच्या साक्षी महत्त्वपूर्ण ठरल्या. आरोपीतर्फे 3 साक्षीदार बचावासाठी तपासण्यात आले होते. सरकारी वकील यांनी न्यायालयासमोर प्रभावी युक्तिवाद मांडला व त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन आरोपी पती दिनेश महादेव कदम व सासू मिनाक्षी महादेव कदम यांना जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता एस. नेवसे यांनी दोषी ठरवून भा.दं.वि.सं. कलम 306 अन्वये 10 वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी 25 हजार रुपये दंड तसेच दंड न भरल्यास ६ महिने साधा कारावास आणि भा, दं.वि.सं. कलम 498 (अ) अन्वये 3 वर्षे सक्तमजुरी आणि प्रत्येकी 10 हजार रुपये दंड व दंड न भरल्यास 6 महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली. आरोपीतर्फे शिक्षेबाबत न्यायालयामध्ये युक्तीवाद करताना त्याचे दुसरे लग्न केले असून त्याला एक मुलगी आहे व त्याचे वडील ज्येष्ठ नागरिक आहेत. त्यामुळे कमीत कमी शिक्षेची मागणी केली मात्र न्यायालयाने मयत काव्या ही आत्महत्या करताना 6 महिन्याची गरोदर होती त्यामुळे यामध्ये दोन निष्पाप जीव गेल्याने गुन्ह्याची गंभीरता विचारात घेवून कायद्याने दिलेली10 वर्षांची शिक्षा आरोपींना दिली.

या न्यायनिर्णयाने पीडितेला व तिच्या कुटुंबियांना न्याय मिळाल्याची भावना मयत काव्याच्या नातेवाईकांनी व्यक्त केली. या शिक्षेमुळे हुंडाबळी व कौटुंबिक हिंसाचारग्रस्त महिलांवर होणाऱ्या अत्याचारामध्ये कायद्याचा धाक बसून अशा गुन्ह्यामध्ये घट होईल अशी प्रतिक्रिया सरकारी वकीलांनी दिली. सत्र खटल्याकामी सरकार पक्षातर्फे सरकारी वकील साळवी यांनी काम पाहिले तसेच तपासिक अंमलदार पोलीस निरीक्षक शरद कुवेस्कर व सचिन इंगोले यांनी गुन्ह्याचा सखोल तपास केला व पैरवी अधिकारी म्हणून पो. हवालदार मिनाद कांबळे यांनी काम पाहिले.

# मूलगंधकुटी बुद्ध विहारात बुद्ध पौर्णिमा साजरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव कमिटी, मूलगंधकुटी बुद्ध विहार, सेक्टर-13, खांदा कॉलनी यांच्या वतीने तथागत भगवान गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शुक्रवार, दिनांक १ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता धम्म रॅलीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर आदरणीय भन्ते संघपाल यांनी धम्म प्रवचनाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले, तर स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

या कार्यक्रमास आनंद तेलतुंबडे, मीरा आंबेडकर, छायाचित्रकार सुधारक. ओलवे आणि चित्रकार उत्तम घोडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मोठ्या संख्येने बंधू-भगिनींनी परिवारासह उपस्थित राहून धम्मप्रवचनाचा लाभ घेतला.यावेळी आनंद तेलतुंबडे यांनी उपस्थितांना बुद्ध पौर्णिमेच्या हार्दिक सदिच्छा दिल्या. त्यांनी आपल्या मनोगतात तथागत भगवान बुद्धांनी दिलेला विवेक, परीक्षण आणि सत्यशोधनाचा संदेश आजच्या समाजजीवनासाठी अत्यंत




महत्त्वाचा असल्याचे सांगितले.तथागत भगवान बुद्ध हे मानवमुक्ती, प्रज्ञा, करुणा आणि समतेचा मार्ग दाखविणारे महामानव आहेत. त्यांनी "कोणतीही गोष्ट आंधळेपणाने स्वीकारू नका, तर जीवनातील अनुभव, विचार आणि सत्याच्या आधारे तिची चिकित्सा करा," असा संदेश दिला.

हाच संदेश भारताच्या सामाजिक परिवर्तनासाठी आजही तितकाच प्रेरणादायी आहे.कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध, भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

याबद्दल कमिटीचे अध्यक्ष संजय काबळे यांनी उपस्थितांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले.

# आदर्श पत्रकार पुरस्कारासाठी पत्रकार दिपक पवार यांची निवड

**दैनिक युवक आधार**



**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी -जितेंद्र खोडे :** राळेगाव तालुक्यातील ग्रामीण पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्या बद्दल दै.देशोन्नती चे पत्रकार दीपक पंढरीनाथ पवार यांची सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशन पुणे यांच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या जयंती निमित्ताने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा व राज्यस्तरीय काव्य संमेलन सोहळ्याचे आयोजन केले होते. सदर दीपक पवार यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार प्राप्त झाला आहे. सदर या आयोजित कार्यक्रमांमध्ये आदर्श पत्रकार 2026 या पुरस्कारासाठी दीपक पंढरीनाथ पवार रा.रिधोरा यांची निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार आपल्या परिसरातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या समाजसेवा तथा पत्रकारीतेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यां मान्यवरांना सन्मान चिन्ह व शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात येते. यंदा या पुरस्कारासाठी सोजाई आदिवासी महिला विकास फाउंडेशन पुणे च्या वतीने दिपक पवार यांची निवड करण्यात आली आहे.अध्यक्ष डॉ. प्रशांत डी. चव्हाण, ॲड. जयश्री बी. सोनवणे सचिव, यांच्या वतीने लोक कवी सिताराम नरके राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार दिपक पवार यांना प्रदान करण्यात आला आहे.या कार्यक्रमाचे अध्यक्ष सिताराम नरके, तर उमेश चव्हाण रुग्ण हक्क परिषद अध्यक्ष, तर कार्यक्रमाचे उद्धाटक अक्षय दिलीप सरवदे पोलीस उपनिरीक्षक पुणे, प्रमुख अतिथी प्रियंका प्रवीण बारसे पि.चि.म.न.पा. नगरसेविका, प्रमोद वाघ वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिघी पोलीस स्टेशन, मनोज लक्ष्मण साळवे उद्योजक, अतुल गुंजाळ, तर या पुरस्कार सोहळयाला प्रमुख पाहुणे म्हणून अभिनेता मॉडेल सेलिब्रिटी ज्युरी एम टेक सिव्हिल इंजिनिअर शासकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला आहे. सदर हा कार्यक्रम डॉक्टर प्रशांत डी चव्हाण, डॉक्टर ओंकार डी चव्हाण, एडवोकेट जयश्री बी सोनवणे, द्रोपदी बी सोनवणे, दत्तात्रय चव्हाण, लताबाई डी. चव्हाण, संगीता किशोर बोरुडे यांनी खास करून वेगवेगळया क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यां नागरिकांसाठी आयोजित केला असल्याचे एडवोकेट जयश्री सोनवणे यांनी सांगितले आहे

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या काश्मीर अभ्यास दौऱ्याची यशस्वी सांगता

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** पनवेल तालुक्यातील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था असलेल्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाच्या ११ सदस्यांनी काश्मीरचा अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण केला. सदर दौऱ्यात स्थानिक व्यावसायिक,पर्यटन स्थळे तसेच राजकीय व्यक्तिमत्त्वांच्या गाठी भेटी घेत सदस्यांनी विविध क्षेत्रातील नाविन्यपूर्ण गोष्टींचे अध्ययन केले.२६ एप्रिल रोजी सुरू झालेल्या दौऱ्याची महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे रोजी सांगता झाली.अध्यक्ष राजेंद्र पाटील यांच्या नेतृत्वात संपन्न झालेल्या दौऱ्याचे संपूर्ण नियोजन सल्लागार विवेक पाटील, संजय कदम आणि मंदार दोंदे यांनी





केले होते. विशेष म्हणजे मंचातील सदस्यांनी माजी खासदार लोकनेते दि बा पाटील(प्रस्तावित )नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थेट श्रीनगर फ्लाईटने उड्डाण केले तसेच थेट श्रीनगरहून याच विमानतळावरती लँडिंगचा अनुभव घेतला. बहुतांश सदस्यांनी प्रथमच नवी मुंबई विमानतळाचे अंतरंग एन्जॉय केले.या दौऱ्यात मंचातील सदस्यांनी श्रीनगर मध्ये शालीमार उद्यान, निशात उद्यान, दाचीगाम नॅशनल पार्क, चष्मेशाही उद्यान, शंकराचार्य हिल मंदिर, शिकारा मार्केटिंग, हाउस बोट स्टे यांचा आनंद लुटला.

पॉईंट, हॉर्स रायडिंग यांचा मनमुराद आनंद मंचातील सदस्यांनी लुटला. श्रीनगर पेहेलगाम प्रवासात केसराच्या शेतजमिनी आणि क्रिकेट बॅट फॅक्टरी एक्सप्लोर करण्यात आले. अवंतीपुरा येथील विष्णू मंदिर भग्न अवशेष स्थानाला भेट देऊन त्याच्या इतिहासाचे अध्ययन सदस्यांनी केले. काश्मीर दौऱ्यातील सौंदर्याचे गंडस्थळ म्हणजे गुलमर्ग येथील गोंडोला राईड. शुभ्र बर्फाची चादर आणि हिमवर्षाव यांचा अवर्णनीय आनंद मंचातील सदस्यांनी अनुभवला. तब्बल १४ हजार फूट उंचीवरील सेकंड फेज वर हिमवर्षाव अनुभवत असताना अचानक हिम वादळ आले. भारतीय सेनेने तातडीने परिस्थितीचा ताबा घेत सर्व पर्यटकांना सुरक्षितरित्या रोप वे च्या सहाय्यतेने खाली उतरवले.या अभ्यास दौऱ्यात मंचातील सदस्यांनी संयुक्त संसदीय समिती सदस्य खासदार एम के राघवन आणि खासदार सुरेंद्र चौधरी यांची भेट घेतली. यावेळी संसदीय संयुक्त समितीच्या कार्यपद्धती बाबत चर्चा करण्यात आली. खासदार एम के राघवन यांनी मंचातील सदस्यांना दिल्ली येथील निवासस्थानी आमंत्रित केले आहे. यासोबतच काश्मिरी गालिचा हातमाग कलाकारांची भेट, सफरचंद बाग आणि स्थानिक व्यंजनांचा आस्वाद सगळ्यांनी लुटला.

अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे,उपाध्यक्ष दिपक घोसाळकर, सरचिटणीस हरेश साठे, खजिनदार दत्ता कुलकर्णी, प्रवीण मोहेकर, निलेश सोनावणे, लालचंद यादव, राजू गाडे यांनी काश्मीर अभ्यास दौऱ्यात सहभाग नोंदवला होता.

# एच.एस.सी.निकालात स्मॉल वंडर कॉलेजच्या तन्वी बोरकरचे उल्लेखनीय यश

**दैनिक युवक आधार**

**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे** : वडकी स्मॉल वंडर्स हायस्कूल ॲड ज्युनिअर कॉलेज,वडकी येथील विद्यार्थ्यांनी एच.एस.सी.परीक्षा विज्ञान शाखेत उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे,दि.२ मे रोजी जाहीर झालेल्या निकालात विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट टक्केवारी मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली.या परीक्षेत तन्वी मोहनराव बोरेकर हिने ८६.१७% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. श्रावणी रंजू चौधरी हिने ८३.१७% गुण मिळवत द्वितीय स्थान मिळवले, तर खुशबू गजानन बेसेकर हिने ७७.१७% गुणांसह



तृतीय क्रमांक मिळवला.तसेच प्रतीक्षा अभय जवादे हिने ७६% गुण,श्रुतिका प्रमोद चौधरी हिने ६७.१७% गुण आणि जानवी अवधूत जंजाळ हिने ६५.५०% तर श्रुती अनिल गवळी हिने ६५% गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. इतर विद्यार्थ्यांनीही समाधानकारक यश मिळवले आहे.या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे,त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे सर्वत्र कौतुक होत आहे.शाळेच्या या यशामुळे स्मॉल वंडर्स जुनिअर कॉलेज वडकीच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

शाळेच्या प्राचार्य डॉ.मंजुषा सागर,विजय फुलकर,वैभव करडे,शंकर मालखेडे व इतर सर्व शिक्षकवर्ग यांनी विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे कौतुक करत अभिनंदन केले.

पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई अजित दादा पवार यांच्या विजयाचा उमरीत फटाके फोडून आनंदोत्सव जल्लोष साजरा

**दैनिक युवक आधार :**

**उमरी वार्ताहर /रुपेशकुमार ग.श्रीरामवार** : बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई अजितदादा पवार यांनी विक्रमी मतांनी विजय मिळवल्याच्या पार्श्वभूमीवर उमरी शहरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी उमरी व गोरठेकर मित्र मंडळाच्या वतीने नगरपरिषद चौक येथे फटाके फोडून आणि घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या वेळी उपस्थित उमरी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, नगरपालिकेचे




उपनगराध्यक्ष तथा नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, माजी नगराध्यक्ष प्रवीणभाऊ सारडा, नगराध्यक्ष प्रतिनिधी भगवान मुदीराज, गटनेते राजेश जाधव, जिल्हा परिषद सदस्य प्रतिनिधी आनंदराव यल्लमगोंडे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष राजीव पाटील इज्जतगावकर, सभापती संदीप चंदनवार, नगरसेविका श्रीमती अनुसयाबाई कटकदवणे, नगरसेवक एजाज खान, विकी रननवरे आदी अनेक जण या वेळी उपस्थित होते.

# परतुरच्या राहुल काळे यांनी राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेत गोल्ड व सिल्वर मेडल प्राप्त केले

**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** जालना येथे राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेचे आयोजन दि.१,२ आणि ३ मे २०२६ रोजी राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेतआंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी परतुरच्या सिलंबम खेळाडू राहुल विश्वनाथ काळे यांनी गोल्ड मेडल व सिल्वर मेडल प्राप्त करून मोठे यश मिळविले आहे.जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन शाखा परतुरचे कोच रोहित माणिक जैस्वाल. यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल काळे यानी उत्कृष्ट सराव व मेहनतीच्या जोरावरआपले स्थान नॅशनल मध्ये निश्चित केले आहे.राहुल याच्या यशामुळे परतुर तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आगामी राष्ट्रीय स्पर्धेत राहुल उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे




नाव उज्ज्वल करील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# सिद्धार्थ कनिष्ठ महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले लाखनी भंडारा** : सावरी/मुरमाडी येथील सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय मध्ये १ मे रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी जीवन शिक्षण संस्था, लाखनीचे सचिव धनंजयजी तिरपुडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते ध्वजारोहण



करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या कु. स्वाती वासनिक मॅडम होत्या.

प्रमुख पाहुणे धनंजयजी तिरपुडे यांनी महाराष्ट्र दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून देत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. त्यांनी महाराष्ट्राच्या प्रगतीत युवकांची भूमिका अधोरेखित केली. तर अध्यक्ष कु. स्वाती वासनिक यांनी कामगार दिनाचे महत्त्व स्पष्ट करून मेहनत, शिस्त आणि प्रामाणिकपणाचे मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यालयातील श्री. काशिवार, रिनाईत, खोब्रागडे, ठाकरे, मेमन, लोगडे, राऊत, सिंगनजुडे तसेच कु. स्मिता आगाशे, कु. साठवणे, सौ. कोरे, सौ. आगाशे, कु. गभणे, कु. सुखदेवे आदी शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अगळे मॅडम यांनी केले. कार्यक्रमाची सांगता महाराष्ट्र गीताने करण्यात आली.

# मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईच्या वतीने रवींद्र मालुसरे पुरस्कृत "निर्भीड जागल्या सन्मान पुरस्काराने,"गुरुनाथ तिरपणकर"सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** मुंबई-वृत्तपत्र लेखक हा जागल्याचे काम करत असतो, महाराष्ट्र राज्याचे आणि मराठी माणसांचे मूलभूत प्रश्न सातत्याने आपल्या लेखणीतून व निर्भीडपणे लिहून जनजागृतीचे काम करीत असतो, त्यातीलच गुरुनाथ तिरपणकर हे आहेत. गुरुनाथ तिरपणकर यांची पत्रकारितेतील सुरुवात ही पत्र लेखनानेच झाली आहे. गेली३५वर्षे सामाजिक व पत्रकारिता, वृत्तपत्र लेखन क्षेत्रात कार्यरत आहेत, त्यांच्या कार्याची दखल सुवर्ण महोत्सवी वर्षात कार्य करणाऱ्या मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईने घेतली. नुकताच मधु शिरोडकर यांच्या कालप्रवाह या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात प्रमुख




पाहुणे पद्मश्री उदय देशपांडे यांच्या हस्ते रवींद्र मालुसरे पुरस्कृत'निर्भीड जागल्या सन्मान पुरस्कार'समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला.गुरुनाथ तिरपणकर हे जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष म्हणून गेली सहा वर्षे कार्यरत आहेत.संस्थेच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, महिला सक्षमीकरण अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय उपक्रम राबवून जनजागृतीचे काम केले आहे.विविध सामाजिक संस्थांवर ते पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.तसेच मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबई, ठाणे जिल्हा वृत्तपत्र लेखक संघ, महाराष्ट्र राज्य मराठी मुक्त पत्रकार संघ, पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मराठी पत्रकार संघ अशा पत्रकार व वृत्तपत्र लेखक संघटनांवर कार्यरत आहेत.गुरुनाथ तिरपणकर यांना"निर्भीड जागल्या सन्मान पुरस्काराने"सन्मानित केल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.

याप्रसंगी नवशक्तीचे संपादक प्रकाश सावंत, माजी संपादक प्रकाश कुलकर्णी, साहित्यिक अशोक बेंडखळे, संघाचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे, माजी महापौर अरुण देव, संघाचे आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# पालीदेवद सुकापूरात महाराष्ट्र दिनाचा जल्लोष

## उबाठा, शिवसेनेच भव्य हळदीकुंकू सोहळा आणि प्रेरणादायी व्याख्यानाने नागरिक भारावले

**दैनिक युवक आधार**

**दिपक कोळवणकर /सुकापूर प्रतिनिधी** : महाराष्ट्र दिन, कामगार दिन आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त पालीदेवद सुकापूरात शिवसेनेच्या वतीने आयोजित भव्य कार्यक्रमाला नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. हळदीकुंकू सोहळा आणि छत्रपती शिवाजी महाराजांवरील प्रभावी व्याख्यानामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात सायंकाळी साडेसातच्या सुमारास झाली. शिवसेना उपनेते बाळ माने, सहसंपर्क प्रमुख अनिल चव्हाण आणि विधानसभा संघटक दीपक निकम यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर चैतन्य महाराज बुरुडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रम, स्वराज्य संकल्पना आणि विचारांवर सुमारे एक तास प्रभावी व प्रेरणादायी व्याख्यान दिले.




या व्याख्यानाने उपस्थितांना इतिहासाची जाणीव करून देत नवचैतन्य निर्माण केले. महिलांसाठी आयोजित हळदीकुंकू समारंभही मोठ्या उत्साहात पार पडला. महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पारंपरिक वातावरणात हा कार्यक्रम रंगला. यावेळी विभाग प्रमुख धनंजय पाटील, विशाल भोईर, उपविभाग प्रमुख जयंत पाखरे, शाखा प्रमुख हनुमंत खंडागळे, महिला आघाडीच्या भारती गोसावी तसेच डॉ. सेलचे राज्य उपाध्यक्ष डॉ. आशिष बांदेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# वैनतेय विद्यालयाचा १२ वी निकाल १०० टक्के; यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : येथील वैनतेय विद्यालय व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ने इयत्ता 12 वीच्या निकालात शंभर टक्के यश संपादन करत आपल्या उज्ज्वल परंपरेला यंदाही कायम ठेवले आहे. कॉलेजमधील एकूण 131 विद्यार्थी परीक्षेस बसले होते आणि सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण होऊन उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

या निकालात 48 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले असून 76 विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर 7 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीसोबतच प्राध्यापकांच्या मार्गदर्शनामुळे हा उल्लेखनीय निकाल लागल्याचे मानले जात आहे.

कॉलेजमधील गुणवत्ता यादीत ऋषांक सुनील गायखे (86.00%) प्रथम क्रमांकावर राहिला. शिफा साहिल शेख (85.50%) आणि अर्जुन दत्तात्रय कडपे (85.50%) यांनी संयुक्त द्वितीय क्रमांक पटकावला. अदिती ज्ञानेश्वर निकम (84.67%) हिने तृतीय, अथर्व गोरक्षनाथ राजोळे (83.00%) चौथा, तर साहिल प्रकाश सावंत (82.83%) याने पाचवा क्रमांक मिळवला.

या यशाबद्दल न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळ चे कार्यकारी विश्वस्त वि. दा. व्यवहारे, संस्थेचे विश्वस्त रतन पाटील वडघुले, किरण कापसे, राजेंद्र राठी, ॲड. दिलीप वाघवकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले. तसेच विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती मनीषा गुजराथी, उपप्राचार्य सुभाष खाटेकर, पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ व पर्यवेक्षिका श्रीमती आर. एम. लाहोटी यांनीही यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कॉलेजने सलग शंभर टक्के निकालाची परंपरा राखत शैक्षणिक क्षेत्रात आपली गुणवत्ता अधोरेखित केली असून, यामुळे परिसरात संस्थेची प्रतिष्ठा अधिक दृढ झाली आहे.

# बसस्थानकावर महिलांचा रौद्रावतार!

## चिमुकल्याचे दागिने चोरणाऱ्या भामट्याला भर गर्दीत चोप; पोलिसांच्या अनुपस्थितीवर संताप

**दैनिक युवक आधार सुनील राठोड मंगरूळपीर तालुका प्रतिनिधी** : येथील बसस्थानक परिसरात सायंकाळच्या गर्दीत घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. चिमुकल्या बाळाच्या हातातील चांदीचे कडे चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका भामट्याला दोन धाडसी महिलांनी रंगेहाथ पकडत भर स्थानकावरच 'धो-धो' चोप दिला. या घटनेने उपस्थित प्रवाशांचे डोळे विस्फारले असून महिलांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत आहे, तर दुसरीकडे पोलिसांच्या गैरहजेरीबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

दि. ०३ मे २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५:२५ वाजताच्या सुमारास मंगरूळपीर-वाशिम (MH-40 Y 5940) ही बस स्थानकावर येताच प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. याच गर्दीचा फायदा घेत एका चोरट्याने एका लहान




बाळाच्या हातातील चांदीचे कडे अलगद काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, बाळाच्या अंगाला झालेला अनोळखी स्पर्श लक्षात येताच त्या आईने क्षणार्धात चोरट्याचा हात पकडला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखत तिच्यासोबत असलेल्या दुसऱ्या महिलेनेही तत्काळ धाव घेत त्या भामट्याला पकडून ठेवले.

यानंतर "बाळाच्या दागिन्याला हात लावतोस काय?" असा संतप्त सवाल करत या दोन्ही महिलांनी भर गर्दीतच चोरट्याला लोळवून चोप देण्यास सुरुवात केली. महिलांचा हा रुद्रावतार पाहून काही काळ उपस्थित नागरिकही स्तब्ध झाले. काही प्रवाशांनी या प्रकाराचे व्हिडिओ आपल्या मोबाईलमध्ये टिपले. बराच वेळ सुरू असलेल्या या धुलाईनंतर अखेर त्या भामट्याला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले.

या घटनेमुळे बसस्थानक परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. विशेषतः महिला व कुटुंबीय प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून अशा घटनांमुळे सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, एवढ्या मोठ्या आणि वर्दळीच्या बसस्थानकावर सायंकाळच्या वेळी एकही पोलीस कर्मचारी उपस्थित नसल्याची बाब उघड झाल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. गर्दीच्या वेळी चोरीसारख्या घटनांची शक्यता असतानाही पोलिसांची अनुपस्थिती ही गंभीर निष्काळजीपणाची बाब असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. "महिलांनी धाडस दाखवले नसते तर चोरटा सहज पसार झाला असता," अशी प्रतिक्रिया काही प्रवाशांनी व्यक्त केली.

या घटनेत महिलांनी दाखवलेले धैर्य, सतर्कता आणि तत्परता समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. मात्र, याचवेळी प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे.

भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बसस्थानक परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# चौथ्या नवोदित आदिवासी साहित्य परिषदेत डॉ. विलास कनाके यांना 'समाज रत्न पुरस्कार';

**दैनिक युवक आधार ज्योत्स्ना करवाडे विदर्भ संपादिका** : यवतमाळ येथे आयोजित करण्यात आलेली चौथी नवोदित आदिवासी साहित्य परिषद मोठ्या उत्साहात आणि वैचारिक वातावरणात संपन्न झाली. शहरातील सेंट्रल सेलिब्रिशन हॉल येथे पार पडलेल्या या परिषदेत साहित्य, समाजकारण, शिक्षण आणि आदिवासी संस्कृती यांसंदर्भात विविध विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. परिषदेत समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. विलास कनाके यांना प्रतिष्ठेचा 'समाज रत्न पुरस्कार' प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

या परिषदेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रा. तुकाराम रोंगटे, मराठी विभाग प्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे उपस्थित होते. तसेच डॉ. प्रा. संजय लोहकरे आणि डॉ. प्रा. चिंतामण धिंदळे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहिले. मान्यवरांच्या उपस्थितीत झालेली ही परिषद आदिवासी समाजासाठी वैचारिक दिशा देणारी आणि प्रेरणादायी ठरली.

परिषदेत एकूण चार परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक



विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा घडून आली. नवोदित साहित्यिक आणि अभ्यासकांना व्यासपीठ उपलब्ध करून देत परिषदेने दोन नव्या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. यामध्ये मा. मधुसूदन कोवे गुरुजी, अध्यक्ष, ग्राम स्वराज्य महामंच यांनी लिखित 'कर्म योग – आयुष्याच्या पलीकडे असलेलं आयुष्य' या पुस्तकाचे प्रकाशन विशेष आकर्षण ठरले. सामाजिक विषयांवरील चिकित्सक चर्चा, आदिवासी साहित्याची समृद्ध परंपरा आणि नव्या पिढीतील साहित्यिकांना प्रेरणा देणारे मार्गदर्शन यामुळे परिषद प्रभावी ठरली. याच प्रसंगी समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल डॉ. विलास कनाके यांना 'समाज रत्न पुरस्कार' मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन मा. मधुसूदन कोवे गुरुजी यांनी केले, तर प्रा. नितीन टेकाम, पांढरकवडा यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. वसंत कनाके यांनी भूमिका पार पाडली.यावेळी ज्येष्ठ साहित्यिक बाबाराव मडावी आकांतकार, बाळकृष्ण गेडाम, राजू मडावी (गट शिक्षणाधिकारी, बाभुळगाव), प्रभात कनाके, प्रा. संगीता मसराम, लिना बोरकर, जयश्री मडावी यांच्यासह अनेक साहित्यिक, अभ्यासक, सामाजिक कार्यकर्ते आणि नवोदित लेखक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्व सदस्यांच्या सहकार्याने पार पडलेली चौथी नवोदित आदिवासी साहित्य परिषद ही आदिवासी समाजातील साहित्य, विचार आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम ठरत यशस्वी आणि संस्मरणीय ठरली.

### सावखेड्याच्या लेकीचा माहेरी नागरी सत्कार

# 'माहेरचे संस्कारच लोकसेवेची ऊर्जा' : सभापती अनिता बनकर यांचे भावूक प्रतिपादन

**दैनिक युवक आधार योगेश पालोदकर / जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : "ज्या मातीतून संस्कार आणि जनसेवेची प्रेरणा मिळाली, त्याच सावखेडा ग्रामस्थांनी माहेरची लेक म्हणून केलेला हा 'नागरी सत्कार' माझ्यासाठी कोणत्याही पदापेक्षा मोठा आणि भावनिक आहे. ही कौतुकाची थाप भविष्यात अधिक निष्ठेने जनसेवा करण्यासाठी ऊर्जा देणारी ठरेल," असे भावूक उद्गार पंचायत समितीच्या नवनिर्वाचित सभापती सौ. अनिता सुरेश बनकर यांनी काढले.सावखेडा (ता. सिल्लोड) येथे गावकऱ्यांच्या वतीने भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद व



पंचायत समिती सदस्यांसाठी जाहीर भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या गावच्या लेकीने राजकीय क्षेत्रात मिळवलेल्या यशाबद्दल यावेळी सावखेडावासीय भावूक झाले होते.

या सोहळ्यात पंचायत समिती सभापती सौ. अनिता सुरेश बनकर, जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण सभापती सौ. अनिता ज्ञानेश्वर मोठे व सोयगाव पंचायत समिती सभापती उत्तम चव्हाण यांचा विशेष नागरी सत्कार करण्यात आला. तसेच जिल्हा परिषद सदस्य राधाकृष्ण काकडे, डॉ. सचिन वाघ, पंचायत समिती सदस्य नारायण खोमणे, राहुल राठोड, अंकुश कोठाळे, गजानन जाधव, सुदाम बन्सोड यांचाही गावकऱ्यांच्या वतीने यथोचित सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला भाजपा प्रदेश चिटणीस तथा विधानसभा नेते सुरेश बनकर, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष अशोक दादा गरुड, ज्येष्ठ नेते दिलीप काका दानेकर, माजी सभापती ज्ञानेश्वर तायडे, सौ. सीमाताई उटाडे, भवन मंडळ तालुकाध्यक्ष एकनाथ हिवाळे, विजय वानखेडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या सोहळ्यास संजय निकम, पोपटराव कुंटे, रघुनाथ तायडे, विनायक सपकाळ, ज्ञानेश्वर साळुंके, साहेबराव शेजुळ, जगदीश कवाल, भागवत शिंदे, प्रवीण उमारीया, जितेंद्र जैस्वाल यांच्यासह सावखेडा परिसरातील ग्रामस्थ, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आपल्या आशीर्वादानेच इथपर्यंत पोहोचता आले असून समाजाच्या विकासासाठी प्रामाणिकपणे काम करू, अशी ग्वाही यावेळी नवनिर्वाचित प्रतिनिधींनी दिली.

# सुशी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे** : गेवराई तालुक्यातील सुशी येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्य तथा गटनेते परमेश्वर खरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करून अभिवादन करण्यात आले. तर दि.२९ एप्रिल २०२६ रोजी भव्य मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीत गावातील सर्व जाती-धर्मातील तरुणांनी एकत्र येत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवले.भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सुशी येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.जयंतीनिमित्त गावात उत्साही वातावरण निर्माण झाले होते. बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून मिरवणूक मार्गावरुन मिरवणूक काढत अभिवादन करुन तरुणांनी त्यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा संकल्प केला. तर यावेळी कार्यक्रमास सुशी च्या सरपंच शशिकलाबाई



कांबळे , रिपाइंचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, मनोज हजारे, वंचित बहुजन आघाडीचे युवा जिल्हा संघटक प्रदीप तुरुकमारे, उपसरपंच गजानन मोंढे, विजय पौळ, विजय राठोड, पंडित तुरुकमारे, लक्ष्मण तुरुकमारे ,संदीप तुरुकमारे, बबन तुरुकमारे, सोमनाथ तुरुकमारे, सुर्यकांत तुरुकमारे, विक्रम तुरुकमारे, दौलत तुरुकमारे ,केरबा कांबळे, सयाजी कांबळे, सर्जेराव कांबळे, नंदु मोंढे, संभाजी पौळ, विठ्ठलमामा राऊत यांच्यासह गावातील जेष्ठ मान्यवर उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमात महिलांसह अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता सर्वांनी एकत्र येत बाबासाहेबांच्या समतेच्या आणि बंधुतेच्या विचारांना उजाळा देत जयंती उत्साहात साजरी केली.

# बुद्धाला देव नव्हे, विचार म्हणून जपा!

# कोळगाव बु. येथे भिसडे यांचे सणसणीत प्रतिपादन

**दैनिक युवक आधार करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : "बुद्ध हा देव नव्हे, तर इतिहासातील पहिला मानवतावादी विचारवंत आहे. त्याला दैवत बनवून त्याचा खरा विद्रोही इतिहास झाकण्याचा प्रयत्न झाला," असे ठाम प्रतिपादन व्याख्याते गोपाल भिसडे यांनी केले. मालेगाव तालुक्यातील कोळगाव (बु.) येथे बौद्ध पौर्णिमेनिमित्त आयोजित प्रबोधन कार्यक्रमात ते बोलत होते.

या कार्यक्रमाचे आयोजन गावातील बांधवांनी उत्साहात केले होते. पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. आपल्या भाषणात भिसडे यांनी बुद्धाच्या मूळ तत्त्वज्ञानावर प्रकाश टाकत सांगितले की, "अत्त दीप भव" — स्वतःच स्वतःचा दीप बना, हा बुद्धाचा खरा



संदेश आहे. त्यांनी कधीही स्वतःला ईश्वर किंवा अवतार घोषित केले नाही.

भिसडे पुढे म्हणाले की, बुद्धांनी चार आर्यसत्य आणि अष्टांगिक मार्ग देऊन मानवी दुःखाचे मूळ आणि त्यावरील उपाय स्पष्ट केले. त्यांच्या शिकवणीत कुठेही पूजा, कर्मकांड किंवा यज्ञाचा उल्लेख नाही. उलट त्यांनी वर्णव्यवस्था, यज्ञातील हिंसा आणि पुरोहितशाही यांना ठाम विरोध केला. स्त्रिया आणि शूद्रांना संघात प्रवेश देणे हा त्या काळातील मोठा सामाजिक विद्रोह होता.

**दैवतीकरणाची प्रक्रिया कशी सुरू झाली?**

यावर भाष्य करताना भिसडे म्हणाले की, सुरुवातीला बुद्धसंघात मूर्ती नव्हत्या. स्तूप, बोधिवृक्ष आणि पदचिन्हे हीच प्रतीके होती. नंतर ग्रीक प्रभावातून गांधार शैलीत बुद्धाच्या मूर्ती निर्माण झाल्या. पुढे त्यांना विष्णूचा नववा अवतार घोषित करून वैदिक व्यवस्थेत समाविष्ट करण्यात आले.

ते म्हणाले, "आज बुद्ध पौर्णिमेला दिवे लावले जातात, पण बुद्धांनी सांगितलेले शील, समाधी आणि प्रज्ञा यावर चालणारे किती लोक आहेत?" असा सवाल त्यांनी उपस्थितांना करत विचारमंथन घडवले.

**अशोकाच्या कार्याचाही उल्लेख**

भिसडे यांनी सम्राट अशोकाच्या कार्याचा उल्लेख करत सांगितले की, बुद्ध विचार जगभर पोहोचवण्यासाठी अशोकाने आयुष्य झोकून दिले. त्यांनी सुमारे ८४ हजार स्तूप आणि विहार उभारले किंवा जीर्णोद्धार केले. आज सांची, सारनाथ, वैशालीसारखी काही ठिकाणेच उरली आहेत.

**"बुद्धाला पुन्हा माणसात आणा"**

आजच्या काळात बुद्ध आणि अशोक यांच्या विचारांची गरज अधोरेखित करत भिसडे म्हणाले, "बुद्धाला देवाच्या सिंहासनावरून खाली उतरवून पुन्हा माणसात आणण्याची गरज आहे. मूर्ती फोडण्याची नव्हे, तर विचारांची चिकित्सा करण्याची आवश्यकता आहे. बुद्धविचार समजून घेणे हीच खरी बुद्ध जयंती आहे."

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी पंचशील नवयुवक टीम, कोळगाव (बु.) तसेच गावातील महिला व ग्रामस्थांनी मोलाचे सहकार्य केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

# श्री छत्रपती विद्यालय व जुनिअर कॉलेज वावोशीच्या बारावी बोर्ड परीक्षेतील यशाबद्दल गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**दैनिक युवक आधार खालापूर - संतोष शेवाळे** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने जाहीर केलेल्या बारावी परीक्षेत श्री छत्रपती जुनिअर कॉलेज वावोशी च्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे. वाणिज्य शाखेचा निकाल 80.55% व कला शाखेचा निकाल 75% लागला असून वाणिज्य शाखेमध्ये प्रथम क्रमांक सुप्रिया सुप्रिया जानू बर्गे 74.83%द्वितीय क्रमांक सायली संदेश पवार 74.17%तृतीय क्रमांक कविता विठ्ठल ढेबे 70.00%कलाशाखेमध्ये प्रथम क्रमांक विशाखा विजय मोरे 73.00%द्वितीय क्रमांक साधना विनोद चव्हाण 68.50% तृतीय क्रमांक वेदांत भास्कर दळवी 59.00% विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल बोलताना प्राचार्य श्री आर.डी गावित सर यांनी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे शिक्षकांचे कौतुक केले. शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री विजय (भाऊ) पाटील यांनी विद्यार्थ्यांनी केलेली मेहनत व तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच हे यश शक्य झाले आहे. विद्यार्थी ग्रामीण भागातून पायी चालत येऊन शिक्षण घेतात याबद्दल विद्यार्थ्यांचे कौतुक आहे. असे मत व्यक्त केले. ज्यूनियर कॉलेज इन्चार्ज श्री प्रशांत शेळके, सकाळ सत्र प्रमुख श्री मुकेश कोकणी, दुपार सत्र प्रमुख श्री विजय ठाकरे, श्री राहुल पाटील, श्री सचिन गावंडे श्री धाऊ खरात, सौ दीक्षा पेरवी सौ स्वप्नाली पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शाळा सल्लागार समितीचे सर्व सदस्य संस्थेचे पदाधिकारी यांनी सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांचे बोर्ड परीक्षेतील यशाबद्दल अभिनंदन केले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# भोर तालुक्यात 4 वर्षीय चिमुरडीवर अत्याचार करून हत्या

## 65 वर्षीय नराधमाला अटक, आरोपीला फाशी देण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर गावात 1 मे 2026 रोजी घडलेल्या घटने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सुट्ट्यांमध्ये आजीकडे आलेल्या 4 वर्षांच्या चिमुरडी दुपारी 3 वाजता घरासमोर खेळत असताना गावातीलच 65 वर्षीय मजूर असलेल्या नराधमाने तिला खाण्याचे आमिष दाखवून फूस लावून जवळच्या गोठ्यात नेले. तिथे तिच्यावर लैंगिक अत्याचार करून दगडाने ठेचून हत्या केली आणि पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली लपवून ठेवल्याने परिसारतखळबळ माजली. या क्रूर घटनेनंतर नसरापूर गावात संतापाचा उद्रेक झाला असून 2 मे रोजी गावाने कडकडीत बंद पाळला. शेकडो महिला व ग्रामस्थांनी पोलीस चौकीला घेराव घातला आणि मुंबई-बंगळुरू हायवेवर रास्ता रोको केला. नवाले ब्रिजवर मृतदेह



ठेवून 'आरोपीला फाशीच द्या' अशी मागणी करत जोरदार निदर्शने करण्यात आली.

दुपारी 3:45 पासून मुलगी दिसत नसल्याने कुटुंबीयांनी शोध सुरू केला. परिसरातील CCTV फुटेजमध्ये आरोपी मुलीला घेऊन जाताना दिसल्याने; सायंकाळी 5:30 वाजता बनेश्वर फाट्याजवळ ग्रामस्थांनी त्याला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले. संध्याकाळी 6वाजता गोठ्यातून मुलीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता व POC-SO कायद्यांतर्गत गुन्हा दाखल असून न्यायालयाने 7 मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी सांगितले की, आरोपीची जुनी गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे,पोलिसांनी फॉरेन्सिक टीमच्या मदतीने घटनास्थळावरून पुरावे गोळा केले असून एसपी संदीप सिंह गिल यांनी घटनास्थळी भेट देऊन लवकर चार्जशीट दाखल करण्याचे लेखी आश्वासन दिले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी असे स्पष्ट केले. महाराष्ट्रात अशा नराधमांना थारा नाही, कायद्याचा बडगा उगारला जाईल असा इशाराही त्यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी या घटनेला "मानवतेला कलंक" संबोधले. त्यांनी पुणे ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांशी चर्चा करून दोषीवर कठोर कारवाईचे आश्वासन घेतले आणि स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले. शिवसेना यूबीटी खासदार संजय राऊत यांनी मात्र सरकारवर टीका करत "पुण्यात नाबालिगवर रेप करून हत्या होते, याचा अर्थ गुन्हेगारांना कायद्याचा धाक राहिला नाही. मुख्यमंत्री-गृहमंत्री देवेंद्र फडणवीस कायदा-सुव्यवस्था सोडून इतर राज्यांच्या निवडणुकांत व्यस्त आहेत" असे म्हटले. माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही ही घटना अत्यंत शर्मनाक असल्याचे सांगून आरोपीला फाशीची शिक्षा आणि फास्ट-ट्रॅक कोर्टात सुनावणीची मागणी केली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी पीडित कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले व सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन दिले. सध्या नसरापूर गावात तणावपूर्ण शांतता असून पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. आरोपीची पोलीस कोठडीत चौकशी सुरू असून वैद्यकीय व फॉरेन्सिक अहवालाची प्रतीक्षा आहे. संपूर्ण राज्यातून आरोपीला फाशीची मागणी जोर धरत आहे.

# दिग्रसला प्रथमच रब्बी खेळाचे प्रशिक्षण

## 5 दिवसीय क्रीडा शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी दिग्रस /उमेश साखरकर** : दिग्रस शहरात प्रथमच 'रब्बी' या अधिकृत खेळाचे पाच दिवसीय उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर उत्साहात पार पडले. एकलव्य स्पोर्ट अकॅडमीतर्फे आयोजित शिबिरात राष्ट्रीय संघ व्यवस्थापक उमेश भटकर, राष्ट्रीय पदक विजेती कृतिका बढीये व हितेन डोंगरे यांनी मार्गदर्शन केले.




रब्बी खेळाला भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाची मान्यता असून, राष्ट्रीय व राज्यस्तर खेळाडूंना शासकीय नोकरीत 5% आरक्षण लागू आहे. यामुळे ग्रामीण खेळाडूंना राष्ट्रीय स्तराची संधी मिळणार असल्याचे उमेश भटकर यांनी सांगितले.शिबिरात खेळाचे नियम, फील्ड पोझिशन, बॉल पासिंग व रणनीतीचे शास्त्रोक्त प्रशिक्षण देण्यात आले. "रब्बी नाव पहिल्यांदाच ऐकले, पण आता राष्ट्रीय स्तरावर खेळायचे आहे," अशी प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी दिली.समारोपप्रसंगी प्रमाणपत्र वाटप झाले. यापुढे नियमित प्रशिक्षण वर्ग सुरू ठेवणार असल्याचे आयोजकांनी जाहीर केले. या शिबिरामुळे तालुक्यातील क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त झाला. जिल्हा परिषद शिक्षक विनोद तायडे, लक्ष्मण टेकाळे, पंकज परांडे, अमोल पांढरकर यांचे सहकार्य लाभले.आश्विन जाधव, अजय कांबळे,खुशाल राठोड, यश टेकाळे, पियूष जाधव, कोमल राठोड, योगेश तायडे,युवराज गावंडे, दक्ष भटकर, समर्थ तायडे, रोहन जगदळे, अभिराज गायकवाड, योगेश जाधव, अनमोल काळे,सार्थक पंधरे, परी काळे, धनश्री गावंडे, परीदी बरडे, अक्षरा आडे,कोमल इंगळे,अक्षरा राऊत उपस्थित संपन्न झाला.

# श्री केशव नारायण म्हात्रे यांचा सेवा गौरव समारंभ

**दैनिक युवक आधार**

**खालापूर - संतोष शेवाळे** : श्री छत्रपती विद्यालय वावोशी ता खालापूर जि रायगड येथे कार्यरत असलेले ज्येष्ठ शिक्षक श्री के एन म्हात्रे सर यांचा सेवा गौरव समारंभ विद्यालयांमध्ये नुकताच पार पडला या सेवा गौरव समारंभासाठी शाळा सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री विजय भाऊ पाटील तुंग रतन विभाग गुळसुंदे शाळेचे माजी सल्लागार समिती अध्यक्ष श्री हेमंतशेठ मानकामे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक श्री एस. आर. बेडगे, निरीक्षक श्री एस. एस. पाटील, श्री संजय महाजन सर विद्यालयाचे प्राचार्य श्री आर डी गावित साहेब यांच्या उपस्थितीमध्ये हा सेवा गौरव समारंभ उत्साहात पार पडला. याप्रसंगी सल्लागार समितीचे अध्यक्ष श्री विजय (भाऊ) पाटील यांनी श्री के एन म्हात्रे यांनी 27 वर्ष या संस्थेची प्रामाणिकपणे सेवा केली आणि आज ते



सेवानिवृत्त होत आहेत त्यांनी आजपर्यंत केलेल्या कामाचे कौतुक केले. श्री मानकामे यांनी सांगितले की म्हात्रे सर व त्यांचे कुटुंब अतिशय सुशिक्षित आहे, सहिष्णू आहे. त्यांनी आजवर शाळेला फार वेळ दिला. प्रसंगी घरी कमी वेळ दिला. म्हात्रे सरांचे चिरंजीव विराज व कन्या खुशी यांनी देखील आपल्या वडिलांनप्रति असलेली भावना व्यक्त केली. आमच्यासाठी फार कमी वेळ दिला आणि शाळेसाठी स्वतःला वाहून घेतले असे मत त्यांनी व्यक्त केले. श्री बेडगे सर यांनी संस्थेच्या वतीने निवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी सदिच्छा दिल्या. विद्यालयाचे प्राचार्य श्री गावित सर यांनी श्री छत्रपती विद्यालय म्हात्रे सरांचे नेहमी स्वागत करील त्यांनी केलेल्या कामाचे फळ श्रुती म्हणून त्यांची दोन्ही मुलं हे चांगले शिक्षण घेत आहेत. असे सांगितले. श्री शेळके सर यांनी श्री म्हात्रे सर यांच्या परिचय सर्व पाहुण्यांना करून दिला व त्यांना देण्यात येणाऱ्या मानपत्राचे वाचन केले. विद्यालयातर्फे श्री म्हात्रे सर यांना सेवा गौरव समारंभ निमित्त सन्मान म्हणून शाल, श्रीफळ, पुष्पहार, उभयता पूर्ण पोशाख व मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या सत्काराला उत्तर देताना श्री म्हात्रे सर यांच्या डोळ्यात अश्रू आले व त्यांनी याचसाठी केला होता अट्टाहास, शेवटचा दिवस गोड व्हावा. या ओवीने आपल्या भाषणाची सुरुवात केली व त्यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले. माझे विद्यार्थी माझ्यासाठी प्रथम आणि कुटुंब नंतर अशा पद्धतीचे वर्तन मी आजपर्यंत ठेवले परंतु सेवानिवृत्तीनंतर मी माझा पूर्ण वेळ माझ्या कुटुंबासाठी देईन असे मत त्यांनी आपल्या सत्काराच्या भाषणात व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी मा. सरपंच ॲड रमेश पाटील तंटामुक्ती अध्यक्ष श्री बालचंद्र पाटील, नवी मुंबईचे मुख्याध्यापक श्री मनोज गुरव, श्री देसाई, विवेकानंद इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका सौ मानसी पाटील मॅडम, शाळा सल्लागार समितीचे सर्व सदस्य, वावोशी छत्तीशी विभागातील सर्व हितचिंतक विद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# दिवसाच्या वीजवापरात ७० लाख ग्राहकांना २२३५ कोटी रुपयांचा लाभ

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : राज्यातील वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी टीओडी (टाइम ऑफ डे) सवलत जुलै २०२५ मध्ये लागू केल्यापासून आतापर्यंत ७० लाख ग्राहकांना एकूण २२३५ कोटी रुपयांचा लाभ झाला असून त्यामध्ये १५,९०७ उच्चदाब औद्योगिक ग्राहक एकूण १५३४ कोटी रुपयांच्या लाभासह प्रथम स्थानावर आहेत, अशी माहिती महावितरणतर्फे देण्यात आली.

विजेचा वापर कोणत्या वेळेत झाला त्याच्या आधारे वीजदरात सवलत दिली जाते त्याला टीओडी सवलत म्हणतात. राज्यात जुलै २०२५ पासून १० किलोवॅटपेक्षा जास्त भार असलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीज वापरासाठी सवलत देण्यात आली. या ग्राहकांना एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यांसाठी १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यांसाठी २५ टक्के इतकी मोठी सवलत देण्यात येत आहे.

सर्व घरगुती ग्राहकांनाही प्रथमच टीओडी सवलतीचा लाभ देण्यास सुरुवात झाली असून चालू आर्थिक वर्षात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजवापरासाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत देण्यात येते. स्मार्ट मीटरमध्ये कोणत्या वेळी किती वीजवापर झाला हे मोजण्याची सुविधा असल्याने स्मार्ट मीटर बसविलेल्या घरगुती ग्राहकांना या सुविधेचा लाभ होत आहे.

औद्योगिक ग्राहकांमध्ये उच्च दाब औद्योगिक ग्राहक, उच्चदाब हंगामी औद्योगिक ग्राहक, लघुदाब औद्योगिक ग्राहक आणि यंत्रमाग असा एकत्रित विचार केला तर ४३,९११ औद्योगिक ग्राहकांना एकूण १,७७४ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. राज्यातील उच्चदाब व लघुदाब अशा ११,०१७ वाणिज्यिक ग्राहकांना एकूण २३९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे.घरगुती ग्राहकांना टीओडीचा लाभ मिळण्यास सुरुवात झाल्यापासून त्यांना १,०९६ दशलक्ष युनिट इतक्या विजेसाठी ८९ कोटी रुपयांचा लाभ झाला आहे. या कालावधीतील लाभधारक घरगुती ग्राहकांची संख्या ६९,३५,३८८ इतकी होती. राज्यात घरोघरी स्मार्ट मीटर बसविण्याच्या मोहिमेने वेग घेतला आहे. त्यासोबत टीओडी लाभ मिळणाऱ्या घरगुती वीज ग्राहकांची संख्याही वाढत आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीतील वीजदरातील सवलतीचा लाभ सार्वजनिक पाणीपुरवठा आणि अन्य सार्वजनिक सेवांसाठीही झाला आहे. या घटकांसाठी संबंधित १२,९८९ ग्राहकांना २०२ कोटी रुपयांचा टीओडी लाभ झाला आहे.राज्यातील सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय उर्जेची उपलब्धता वाढली आहे. ही वीज स्वस्त मिळत असल्याने महावितरणने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार दिवसाच्या वीजवापरासाठी सवलत लागू केली आहे. वीज ग्राहकांनी अधिक विजेची गरज असणारी उपकरणे सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत प्राधान्याने वापरून टीओडी सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे.

# सेवेच्या पलीकडे, विश्वासाचे नाते" — नमस्ते फाउंडेशनचा सप्रेवाडी, इगतपुरीत सामाजिक उपक्रम

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : "बदल फक्त तेव्हाच होऊ नये जेव्हा आपण एखाद्याला गमावण्याच्या उंबरठ्यावर असतो. खरं प्रेम शेवटच्या क्षणी दिलेल्या वचनात नसून ते रोजच्या छोट्या कृतींमधून दिसते," या स्तुत्य भावनेतून नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या अध्यक्षा स्नेहल देव यांच्या संकल्पनेतून सप्रेवाडी, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक या छोट्याशा गावात सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमांतर्गत कुपोषित बालकाच्या कुटुंबाला संसारोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात



आले. तसेच गावातील रोजंदारीवर काम करणाऱ्या महिलांना आणि शाळेत जाणाऱ्या मुलींना उन्हापासून संरक्षण मिळावे यासाठी स्कार्फचे वितरण करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान सी.ए. लीना नहार, सीए राहुल नहार यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांना आणि त्यांच्या मुलींच्या तसेच पुढील पिढीच्या शिक्षणाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. याचबरोबर पुढील पिढीच्या शिक्षणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी गावातील महिलांनी सी.ए. लीना नहार, वर्षा बंब यांना आश्वासन दिले की, येत्या काळात आमच्या गावातून किमान एक तरी चार्टर्ड अकाउंटंट घडविण्याचा संकल्प आम्ही पूर्ण करू. अध्यक्ष स्नेहल देव यांनी कष्टकरी महिलांना मार्गदर्शन करताना आपल्या आरोग्याची जबाबदारी स्वतः घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. उन्हात काम करताना स्वतःचे संरक्षण कसे करावे, शरीरात आवश्यक असणारी पाण्याची गरज, तसेच भविष्यात गावात एकही कुपोषित बालक जन्माला येऊ नये यासाठी महिलांनी स्वतःची तब्येत कशी सुदृढ ठेवावी याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

याशिवाय, पौष्टिक आहाराचे महत्त्व, फळांचे नियमित सेवन आणि त्याचा आरोग्यावर होणारा सकारात्मक परिणाम याबाबतही त्यांनी उपस्थित महिलांना माहिती दिली. या उपक्रमामुळे गावात आरोग्य, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकी याबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असून, नमस्ते नाशिक फाउंडेशनच्या या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पनवेलमध्ये विजयाचा जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरीच्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत एकहाती सत्ता मिळवली. हा आनंद देशभर साजरा करण्यात आला, त्या अनुषंगाने भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेलमध्ये फटाक्यांची आतषबाजी आणि मिठाई वाटून आनंद व्यक्त करण्यात आला. पश्चिम बंगाल, आसाम, पुडुचेरी विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन करत स्पष्ट बहुमताने सत्ता स्थापन करण्याच्या पार्श्वभूमीवर देशभर आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या विजयाचा जल्लोष पनवेल शहरातही उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या नेतृत्वाखाली पनवेल येथे फटाक्यांची आतषबाजी करून आणि मिठाई वाटून कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद व्यक्त केला. यावेळी "भारत माता की जय" आणि "भाजपचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित




झुंझारराव, नगरसेवक अजय बहिरा, शहर सरचिटणीस अमित ओझे, प्रशांत शेट्ये, शिल्पा म्हात्रे यांच्यासह पदाधिकारी, आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत हा विजय देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा असल्याची भावना व्यक्त केली.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी पक्षाच्या नेतृत्वाचे अभिनंदन करत आगामी काळातही अशाच प्रकारे जनतेचा विश्वास संपादन करण्याचा संकल्प व्यक्त केला.

### अंधश्रद्धा निर्मूलनाच्या लढ्याला नवी दिशा;

# महाअंनिस भंडारा शाखेचे पुनर्गठन, प्रा. वामन शेडमाके अध्यक्षपदी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे, अंधश्रद्धा, बुवाबाजी आणि सामाजिक गैरसमजांविरोधात प्रभावी जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (महाअंनिस) यांच्या भंडारा शाखेचे नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात पुनर्गठन करण्यात आले. या बैठकीत विविध क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत नव्या कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या पुनर्गठन सोहळयास केंद्रीय निरीक्षक म्हणून राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे तसेच प्रधान सचिव डॉ. सुनील भगत प्रमुख उपस्थित होते. यावेळी भंडारा शाखेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. वामन शेडमाके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली, तर कार्याध्यक्ष म्हणून प्रा. पुरुषोत्तम शहारे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

नव्या कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी शंकर चेटूले, प्रधान सचिवपदी मनोहर टिचकूले, बुवाबाजी संघर्ष कार्यवाह म्हणून विनोद बोधी, वैज्ञानिक जाणिवा प्रकल्प कार्यवाह म्हणून लिलाधर वासनिक, वार्तापत्र प्रकाशन कार्यवाह म्हणून विरेंद्र गजभिये, महिला सहभाग कार्यवाह म्हणून सुरेखा शेडमाके, विविध उपक्रम कार्यवाह म्हणून वसंत सोमकुंवर, जातीअंत विभाग प्रमुख म्हणून श्रीवंत तितरमारे तसेच मुख्य सल्लागार म्हणून राजकुमार बौद्ध यांची निवड करण्यात आली.

सभेची कार्यवाही नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष



चित्तरंजन चौरे यांनी पार पाडली, तर देवयानी भगत यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुनील भगत यांनी केले. यानंतर राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची उद्दिष्टे, कार्यपद्धती आणि समाज परिवर्तनातील संघटनेची भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नागपूर जिल्हा पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वार्तापत्रे, पुस्तके आणि माहितीपत्रके देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शुभेच्छा व्यक्त करताना प्रा. पुष्पा घोडके यांनी भारतीय संविधानाच्या कलम ५१(अ)चा उल्लेख करत, "अंधश्रद्धा निर्मूलन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून समाजप्रबोधनाचे हे कार्य अधिक जोमाने पुढे न्यावे," असे प्रेरणादायी आवाहन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी नवनिर्वाचित अध्यक्ष प्रा. वामन शेडमाके यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानत, भंडारा जिल्ह्यात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जागृतीसाठी संघटनेचे कार्य अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. या प्रसंगी शहरातील अनेक ज्येष्ठ मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते आणि महाअंनिसचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पालोदमध्ये आज 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिर'

## नऊ गावांतील महसूल प्रश्नांचा जागेवरच निपटारा; विद्यार्थ्यांच्या दाखल्यांचीही सोय

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर / जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : महसूल प्रशासकीय कामात गतिमानता आणून सामान्य नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांचे प्रलंबित प्रश्न स्थानिक पातळीवरच निकाली काढण्यासाठी आज, मंगळवारी (दि. ५ मे) पालोद येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' आयोजित करण्यात आले आहे. तहसील कार्यालयाच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सकाळी १० वाजता हे शिबिर संपन्न होणार असून, यात नऊ गावांतील प्रकरणांचा कायदेशीर निपटारा केला जाणार असल्याची माहिती तहसीलदार अंकिता ताकभाते यांनी दिली.

राज्याचे महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हाधिकारी विनयकुमार गौडा यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. या शिबिरात प्रामुख्याने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम १५५ अन्वये सातबारा उताऱ्यातील तांत्रिक दुरुस्त्या करणे, जिवंत सातबारा मोहिमेअंतर्गत मयत वारसांच्या नोंदी घेणे आणि प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढण्याचे काम प्रत्यक्ष सुनावणीद्वारे पूर्ण केले जाईल.

या मोहिमेचा लाभ पालोद महसूल मंडळातील पालोद, डोंगरगाव, दहीगाव, आसाडी, रहिमाबाद, अन्वी, मंगरूळ, चांदापूर आणि चिंचपूर या नऊ गावांतील नागरिकांना मिळणार आहे. आगामी शैक्षणिक वर्ष लक्षात घेता, १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी लागणारे विविध दाखले आणि प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी विशेष कक्षाची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय पांदण रस्ते, शेत रस्ते, ई-पीक पाहणी आणि पीएम किसान योजनेतील तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र कक्ष कार्यान्वित असतील. तहसीलदार अंकिता ताकभाते व मंडळ अधिकारी विशाल शेलकर यांच्या नेतृत्वाखाली सर्व महसूल कर्मचाऱ्यांनी या शिबिराची तयारी पूर्ण केली असून, नागरिकांनी मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# वृत्तपत्रे समाजप्रबोधन व परिवर्तनाच्या चळवळीचे प्रभावी माध्यम : प्रविण पोटे पाटील

## वऱ्हाड विकास विशेष अंकाचे थाटात विमोचन; माजी मंत्र्यांचा भव्य सत्कार

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त तसेच भ. गौतम बुद्ध जयंती, महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून 'वऱ्हाड विकास'च्या विशेष अंकाचे प्रकाशन व माजी मंत्री प्रविण पोटे पाटील यांचा सत्कार समारंभ नुकताच शहरात मोठ्या उत्साहात पार पडला.



या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माजी मंत्री प्रविणजी पोटे पाटील यांनी भूषविले. महात्मा फुले बँकेचे विद्यमान अध्यक्ष दिलीपजी लोखंडे व माजी अध्यक्ष राजेंद्रजी आंडे हे प्रमुख अतिथी म्हणून मंचावर उपस्थित होते.

*पोटे पाटील यांचे मार्गदर्शन : वृत्तपत्रे लोकशाहीचा कणा*

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना माजी मंत्री प्रविण पोटे पाटील म्हणाले, "वृत्तपत्रे ही समाज प्रबोधन व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीला गतीशील करणारे प्रभावी माध्यम आहे. भारतमातेला इंग्रजांच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी तत्कालीन वृत्तपत्रांनी निर्णायक भूमिका बजावली होती. गेल्या चार दशकांपासून 'वऱ्हाड विकास' हे फुले-शाहू-आंबेडकर व सावित्रीबाई फुले यांच्या सत्यशोधकीय चळवळीतील समर्थ साथीदार म्हणून कार्यरत आहे. लोकशाहीतील महत्त्वाचा स्तंभ असलेली वृत्तपत्रे आजही शासकीय योजनांना तळागाळातील सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याचे मोलाचे कार्य सातत्याने करीत आहेत."

शाल, श्रीफळ व ग्रंथभेट देऊन गौरव

यावेळी सर्वशाखीय माळी समाज ऋणानुबंध परिवाराच्या वतीने प्रविणजी पोटे पाटील यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, फुले दाम्पत्यांची प्रतिमा तसेच 'श्रीमद्भगवदगीता' व 'राष्ट्रसंत कोण होते?' ही विचारप्रवर्तक पुस्तके प्रदान करून भावपूर्ण सत्कार करण्यात आला.

'दीनबंधू'चा वारसा पुढे नेणारे वऱ्हाड विकास : प्रा. बनसोड

'वऱ्हाड विकास'चे मुख्य संपादक प्रा. श्रीकृष्ण बनसोड यांनी प्रास्ताविकात सांगितले, "महात्मा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली 'दीनबंधू' वृत्तपत्राने सत्यशोधकीय मूल्ये जनमानसात रुजवली. तोच वारसा 'वऱ्हाड विकास' चालवत आहे. माजी मंत्री प्रविणजी पोटे पाटील हे उपेक्षित व वंचित समाज घटकांच्या उत्थानासाठी सदैव मदतीचा हात देणारे प्रेरणास्त्रोत आहेत."

सर्वसमावेशक नेतृत्वाचा गौरव

राजेंद्रजी आंडे म्हणाले, "पोटे पाटील हे राजकारणासोबत समाजसेवा व आध्यात्मिक कार्याला समान महत्त्व देणारे व्यक्तिमत्व आहे." तर दिलीपजी लोखंडे यांनी "ते सर्व जाती-धर्म-पंथांशी मित्रत्वाचे संबंध जपणारे नेते आहेत," असे गौरवोद्गार काढले. ओमप्रकाश अंबाडकर व इंजि. भरतराव खासबागे यांनी त्यांना भावी राजकीय वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्यास युवा उद्योजक कपिल आंडे, मरार माळी समाजाचे अध्यक्ष रामकुमार खैरे, प्रदीप लांडे, प्रा. एन. आर. होले, वसंतराव भडके, राजेंद्र जठाळे, उमाकांत चिंचोळकर यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. हेमंत बेलोकर यांनी केले. कार्यक्रमाची माहिती प्रसिद्धी प्रमुख जी. जी. फसाटे यांनी दिली.

# चिंचपूर ग्रामस्थांचा 'पाणंद' रस्त्यासाठी उपोषणाचा इशारा

## ६१ शेतकऱ्यांची वहिवाट व गावचा पाणीपुरवठा संकटात; ७ मे पर्यंत रस्ता मोकळा करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर /जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड तालुक्यातील चिंचपूर येथील ६१ शेतकऱ्यांच्या शेतवहिवाटीचा आणि गावच्या सार्वजनिक पाणीपुरवठ्याचा प्रश्न महसूल प्रशासनाच्या कथित दिरंगाईमुळे ऐरणीवर आला आहे. लोकवर्गणी व श्रमदानातून तयार केलेल्या दोन किलोमीटर पाणंद रस्त्याचा शेवटचा टप्पा तांत्रिक अडथळ्यामुळे रखडला असून, येत्या ७ मे पर्यंत सदर मार्ग कायदेशीररीत्या मोकळा न झाल्यास ८ मे पासून तहसील कार्यालयासमोर 'आमरण उपोषण' करण्याचा इशारा माजी सरपंच कैलास सखाराम जंजाळ यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

चिंचपूर येथील शेतकऱ्यांनी रब्बीचा शेतमाल बाहेर काढण्यासाठी आणि आगामी खरीप हंगामाच्या पूर्वतयारीसाठी स्वखर्चातून रस्ता तयार केला आहे. याप्रकरणी महसूल विभागाने ६ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून रीतसर 'पंचनामा' केला असल्याचे निवेदनात म्हटले आहे.




१३ एप्रिल रोजी ग्रामस्थांनी पुन्हा पत्र देऊन रस्ता अडवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाईची मागणी केली होती. मात्र, प्रशासकीय अहवाल अनुकूल असूनही अद्याप कोणतीही ठोस अंमलबजावणी न झाल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी झाली आहे. याबाबत आता महसूल मंत्र्यांकडेही रीतसर दाद मागण्यात आली आहे.

सदर पाणंद रस्त्यावरच गावची पाणीपुरवठा विहीर असून, रस्ता नसल्यामुळे विहिरीवरील ट्रान्सफॉर्मर किंवा मोटार नादुरुस्त झाल्यास तिथे अवजड दुरुस्ती सामग्री नेणे तांत्रिकदृष्ट्या अशक्य झाले आहे. याचा थेट परिणाम सार्वजनिक पाणीपुरवठ्यावर होण्याची भीती निवेदनात व्यक्त करण्यात आली आहे. ७ मे पर्यंत रस्ता मोकळा करून पोलीस बंदोबस्त द्यावा, अन्यथा होणाऱ्या परिणामांची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील, असेही यात नमूद केले आहे. न्याय न मिळाल्यास माजी सरपंच कैलास सखाराम जंजाळ (वय ६७) हे उपोषणाचे हत्यार उपसणार आहेत.

**"प्रशासकीय स्तरावर पंचनामा पूर्ण होऊनही ६१ शेतकऱ्यांचा रस्ता मोकळा न होणे ही खेदजनक बाब आहे. पावसाळा तोंडावर असल्याने शेतमाल काढणे व पेरणीची तयारी करणे आवश्यक आहे. गावचा पाणीप्रश्नही याच 'पाणंद' रस्त्याशी निगडित आहे. ७ मे पर्यंत मार्ग मोकळा न झाल्यास, वयाच्या ६७ व्या वर्षी मला सार्वजनिक हितासाठी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागेल."**

**— कैलास सखाराम जंजाळ (माजी सरपंच, चिंचपूर)**

निवेदन देतेवेळी माजी आमदार साडू पाटील लोखंडे, पं.स. सदस्य किशोर जगताप, प्रा. शिवराम साखळे, रघुनाथ रंगनाथ जंजाळ, साडू त्र्यंबक जंजाळ, गणेश हरिचंद्र जंजाळ, पंढरीनाथ काशीबा जंजाळ, अनिल रामदास जंजाळ, गजानन माधवराव कल्याणकर, सिताराम पाटील जंजाळ आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

# शिक्षकांनी संशोधक वृत्ती वाढवावी - उपेंद्र बेल्लुरकर

**दैनिक युवक आधार**

**सेलू/प्रतिनिधी शिवाजी पवार** : शिक्षकांचे अध्यापन विद्यार्थी केंद्रित असावे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी वेळोवेळी प्रयत्न करावेत. बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांनी स्वतःला अपडेट ठेवणे गरजेचे आहे. शिस्त व गुणवत्ता यावर लक्ष केंद्रित करावे तसेच संशोधक वृत्ती वाढवावी असे प्रतिपादन स्थानिक कार्यवाह उपेंद्र बेल्लुरकर यांनी केले. शहरातील भारतीय शिक्षण प्रसारक संस्था अंबाजोगाई संचलित विवेकानंद प्राथमिक विद्यालयात शैक्षणिक वर्षाचा (२०२५-२०२६ )आढावा घेण्यासाठी सत्रांत बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी शालेय समिती अध्यक्षा करुणा कुलकर्णी, मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे यांची उपस्थिती होती. उपेंद्र बेल्लुरकर बोलताना पुढे म्हणाले की विद्यार्थी- शिक्षक व पालक शैक्षणिक व्यवस्थेचा केंद्रबिंदू आहे. पालक संपर्काच्या माध्यमातून पालकांची भूमिका लक्षात घेता येते. पर्यायाने विद्यालयाच्या उन्नतीसाठी याचा फायदा निश्चितच होतो असे मत व्यक्त केले.

**शिक्षकांनी उपक्रमशील व्हावे - करुणा कुलकर्णी**

शिक्षक हा प्रामाणिक व मेहनती असतो.



आपल्यातील उणिवा दूर करून पुढील वर्षात त्यात सुधारणा करावी. विविध उपक्रम राबवून विषयाप्रती सहजता समजावून सांगावी असे मत त्यांनी व्यक्त केले.मुख्याध्यापक नामदेव एकशिंगे यांनी सर्व शिक्षकांचे मनोबल वाढवून पुढील वर्षात जोमाने व उत्साहाने कार्य शिक्षक करतील अशी अपेक्षा व्यक्त केली.शारदा पुरी यांनी अभ्यासक्रम मंडळाचा अहवाल सादर केला. दिपाली पवार यांनी अभ्यास पूरक मंडळाचा अहवाल सादर केला. स्पर्धा परीक्षा अहवाल विनोद मंडलिक व मूल्यमापन विभागाचा अहवाल अमोल गायकवाड यांनी मांडला. विस्तारसेवा कार्य समिती अहवाल अनिल कौसडीकर यांनी सादर केला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय चौधरी, पद्य अश्विनी पावसे, प्रास्ताविक नामदेव एकशिंगे व आभार विनोद मंडलिक यांनी मानले.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त मलेवाले ट्रेडर्सतर्फे मिस्त्री कष्टकरी कामगारांचा भव्य सन्मान सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : महाराष्ट्र दिन तथा कामगार 1मे26 दिनाचे औचित्य साधून देवणी शहरातील उदगीर-निलंगा मुख्य रस्त्यावरील मलेवाले ट्रेडर्सचे संचालक मुजीब मलेवाले यांनी त्यांच्या प्रशस्त शोरूममध्ये देवणी शहर व तालुक्यातील ग्रामीण भागातील बांधकाम क्षेत्रातील कष्टकरी कामगारांचा सन्मान सोहळा आयोजित केला. सायंकाळी सात वाजता पार पडलेल्या या कार्यक्रमास मोठ्या संख्येने कामगार उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कामगार नेते हाश्मी वशी सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार पांडुरंग कदम, ग्रामीण भागातील पत्रकार प्रतिनिधी लक्ष्मण रणदिवे, भैय्यासाहेब देवणीकर व आदर्श शिक्षक चंद्रकांत मोठेरावे उपस्थित होते. प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा शाल व हार घालून सत्कार करण्यात आला. तसेच ६० हून अधिक बांधकाम मिस्त्री व कष्टकरी कामगारांचाही शाल व हार घालून गौरव करण्यात आला. मनोगत व्यक्त करताना चंद्रकांत मोठेरावे यांनी कामगार दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. पत्रकार पांडुरंग कदम यांनी बांधकाम कामगारांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा




मिळवायचा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

अध्यक्षीय समारोपात हाश्मी वशी सर यांनी कष्टकरी कामगारांच्या कार्याचे महत्त्व विशद करताना, इस्लामिक धर्मग्रंथानुसार श्रमाला सर्वोच्च स्थान असल्याचे सांगितले. कष्टकरी कामगारांचे योगदान समाजासाठी अत्यंत मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत मोठेरावे यांनी केले, तर आभार प्रदर्शन लक्ष्मण रणदिवे यांनी मानले.

या कार्यक्रमात शेख मुख्तारभाई, अलीमभाई मलेवाले, मन्सूर शेख, नयूम शेख, सलीम शेख, सय्यद शेख, सय्यद मलेवाले, जहांगीर मलेवाले, आशू शेख, जावेद शेख, भाईजान, सुनील कांबळे, इस्माईल शेख, साजिद मिर्झा, मैनोद्दीन शेख, नामदेव कांबळे, परमेश्वर धोत्रे, गजानन अजनीकर, टिपण्णा मुदाळे, गोविंद पवार, आनंद शिंदे, अल्ताफ शेख यांच्यासह असंख्य कामगारांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश कांबळे, संतोष पतंगे आणि रवींद्र साबणे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कामगारांनी एकत्रितपणे आयोजक मुजीब मलेवाले यांचा जाहीर सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

# प्रज्ञा बुद्ध विहार तर्फे तीन दिवसीय बुद्ध जयंती

**दैनिक युवक आधार**

**डॉ सुनिल भगत/ नागपूर** : येथील बौद्ध महिला विकास मंडळ व प्रज्ञा बुद्ध विहार जवाहरनगर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने तीन दिवसीय बुद्ध महोत्सव जुना सुभेदार लेआउट नागपूर येथे साजरा करण्यात आला.

दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी बुद्ध पौर्णिमाच्या पूर्व संध्येला बुद्ध महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी बुद्ध विहार समन्वय समितीचे अध्यक्ष श्री अशोक सरस्वती हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी बोलताना त्यांनी सर्व बौद्ध बांधवांना मार्गदर्शन केले. २५०० वर्षापूर्वी बुद्ध धर्माने वैज्ञानिक दृष्टिकोन जगाला दिला तो अंधश्रद्धेच्या बेड्या तोडण्यास शिकवतो. त्यामुळे आजच्या ह्या वाढत्या अंधश्रद्धेच्या काळात त्याचे पालन करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. ह्यानिमित पंचशील ध्वजाचे



आरोहण करण्यात आले आणि बोधीवृक्ष वृक्षारोपण करण्यात आले.दिनांक १ मे २०२६ रोजी सकाळी नऊ वाजता बुद्ध पौर्णिमा च्या निमित्ताने सकाळी बुद्ध वंदना आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

संध्याकाळी सात वाजता गुरुदेव सेवा मंडळाचे अध्यक्ष आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचार प्रचारक ज्ञानेश्वर रक्षक यांनी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणात महाकारुनिक तथागत गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्र संत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा वारसा आपण पुढे चालवावा असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणात श्री अशोक सरस्वती यांनी त्रिगुणी वैशाख बुद्धपोर्णिमाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यानंतर शोभा पाटील आणि गौतम पाटील दाम्पत्याने आपल्या खास शैलीतील "मी रमाई बोलतेय" हा नाट्याविष्कार सादर केला आणि सर्व बौद्ध बांधवाची मने जिंकली. डॉ सुनिल भगत आणि इतर अनेक कलाकारांनी भीम गीते आणि बौद्ध गीते सादर केलीत.

डॉ विशाखा मेश्राम यांनी संचालन केले आणि मंगला गाणार यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी श्री चंद्रमणी रामटेककर, श्री खोब्रागडे,पाटील दाम्पत्य, डांगेबंधू, गेडाम दांपत्य यांनी कार्यक्रमाचे नियोजन करण्यासाठी पुढाकार घेतला.

२ मे २०२६ रोजी बौद्ध महिला विकास मंडळ व प्रज्ञा बुद्ध विहार तर्फे श्रामणेर भिक्षू संघ यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले होते. भदंत अनिरुद्ध यांनी बौद्ध धम्म आणि त्यांचे महत्त्व विशद केले.यावेळी सर्व उपस्थित श्रामणेर भिक्षू संघ आणि बौद्ध बांधवांना भोजनदान करण्यात आले. ह्या तीन दिवसीय बुद्ध पौर्णिमा महोत्सव यशस्वी करण्यासाठी ताराबाई सोमकुवर, उषा मंडपे, गजभिये काकू, सारिका वागदे, भाग्यश्री रामटेककर , सविता मेंढे, सुषमा दाभाडे, साधना दिवे, मंगला गाणार, डॉ विशाखा मेश्राम, निमा वैरागडे, अनुप वैरागडे, मीनाक्षी चिकाटे, राजेश चिकाटे, माया आणि सुधाकर लोखंडे, उन्मेश चिकाटे, कल्पना गायमुखे, वसंत आणि माही मोहिले, वाघमारे कुटुंबीय, संध्या खोब्रागडे , ज्योत्स्ना सोमकुवर, शारदा पिल्लेवान, प्रबोध मेश्राम, डॉ सुनिल भगत ,देवयानी भगत, आणि इतर अनेक मान्यवरांनी परिश्रम घेतलेत.

# प्रतिकूलतेवर मात :उरणची लेक प्रियांशी जामनेकर तालुक्यात प्रथम!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण / प्रतिनिधी :** जिद्द आणि कष्टाच्या जोरावर आभाळाला गवसणी घालता येते, हे अकोला जिल्ह्यातील अनकवाडी या छोट्याशा खेड्यातून आलेल्या एका कन्येने सिद्ध केले आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावीच्या निकालात प्रियांशी आशाराम जामनेकर हिने ८७.५०% गुण मिळवून संपूर्ण उरण तालुक्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे. प्रियांशीचे हे यश कौतुकास्पद आहे, कारण या यशाची पायाभरणी तिच्या आईच्या अखंड श्रमातून झाली आहे.



प्रियांशीचे कुटुंब मूळचे अकोला जिल्ह्यातील अनकवाडी गावचे असले तरी तिचे वडील आशाराम जामनेकर उरणमध्ये एसटी बस चालक म्हणून कर्तव्य बजावतात. घराला आर्थिक हातभार लावण्यासाठी आई मुक्ता आशाराम जामनेकर या उरणमध्ये वडापावचा व्यवसाय करतात. आई दिवसभर कष्ट करून जो पैसा कमवते, त्या कष्टाची जाण प्रियांशीने अभ्यासातून दाखवून दिली. घराची बेताची परिस्थिती असूनही केवळ जिद्दीच्या जोरावर तिने उरण तालुक्यात अव्वल क्रमांक पटकावला.

प्रियांशीने तिचे बारावीचे शिक्षण सिटीझन हायस्कूल अँड ज्युनियर कॉलेज येथून पूर्ण केले. तिला सादिक सर, शैलेंद्र प्रजापती सर, नरेंद्र पाटील सर, प्रमोद पाटील सर आणि साजिया मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच, 'स्वामी विवेकानंद' कोचिंग क्लासचे दत्तात्रय शेळके सर व मयूर पाटील सर यांचीही तिला मोलाची साथ लाभली.

प्रियांशीची हुशारी दहावीपासूनच सर्वांच्या परिचयाची होती. दहावीत असताना स्नितील पडते यांच्या मार्गदर्शनाखाली तिने तेव्हाही आपल्या विषयांवरील पकड आणि हुशारी दाखवली होती दहावीत ही तिने जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट मध्ये तिसरा क्रमांक मिळवून यशाचा पाया रचला होता. सध्या म्हातवली येथील साई दर्शन सोसायटीत राहणाऱ्या प्रियांशीला भविष्यात 'इंजिनीयर' व्हायचे आहे. कॉम्प्युटर सायन्स किंवा आर्टिफिशियल इंटेलिजन्स यासारख्या आधुनिक विषयात उच्च शिक्षण घेऊन तिला आपल्या आई-वडिलांचे नाव उज्वल करायचे आहे. प्रियांशीच्या या यशामुळे संपूर्ण उरण तालुक्यातून तिच्यावर आणि तिच्या कष्टाळू आई-वडिलांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# लेझीमचा ताल आणि फुलांच्या वर्षावात चिमुकल्यांचे 'पहिले पाऊल'

## नवीन शेवे शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी :** रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवीन शेवे येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ अंतर्गत 'शाळा पूर्वतयारी मेळावा क्रमांक १' अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. वयाच्या पाचव्या वर्षानंतर बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आनंदाने रुजवण्यासाठी आयोजित या मेळाव्यात, पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.



लेझीमच्या तालावर जंगी स्वागत

मेळाव्याची सुरुवात अतिशय दिमाखदार पद्धतीने झाली. पहिलीत प्रवेश घेणाऱ्या बालकांचे आणि त्यांच्या पालकांचे लेझीमच्या तालावर शाळेत आगमन झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापिका मोहिनी पाटील आणि नव्या दमाच्या दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. त्यानंतर मुख्याध्यापिकांनी सर्व मुलांचे औक्षण करून त्यांचे स्वागत केले. शाळेत प्रवेश करताना या चिमुकल्यांच्या 'पावलांचे ठसे' घेण्याचा उपक्रम विशेष आकर्षण ठरला.

यावेळी केंद्रप्रमुख शंकर म्हात्रे साहेब यांची विशेष उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत सात विविध टेबलांची (स्टॉल्स) मांडणी करण्यात आली होती. यात शारीरिक विकास (दोरी उड्या, चेंडू फेक), बौद्धिक विकास (फरक ओळखणे), भाषा विकास (गोष्ट सांगणे, चित्र वर्णन), आणि गणन पूर्वतयारी (अंक मोजणी, आकार ओळख) यांसारख्या उपक्रमांद्वारे मुलांची पडताळणी करण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रगतीची नोंद 'विकास पत्रा'मध्ये करण्यात आली.

शाळेने विद्यार्थ्यांसाठी फुगे, चॉकलेट्स, कागदी फुले आणि रंगीत टोप्यांनी सजवलेला एक आकर्षक सेल्फी पॉइंट तयार केला होता. रंगीबेरंगी टोप्या घालून फोटो काढताना मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता.सुंदर रांगोळ्या आणि फुग्यांच्या सजावटीमुळे शाळा परिसर एखाद्या उत्सवासारखा दिसत होता.

या मेळाव्यासाठी मच्छिंद्रनाथ म्हात्रे, प्रवीण म्हात्रे, शर्मिला गावंड, चैताली म्हात्रे, अतीता पाटील ,ज्योती पाटील(अंगणवाडी शिक्षिका) ,या शिक्षकांनी विशेष मेहनत घेतली. माता पालक मोहिनी म्हात्रे, प्रणिता मोकल व इतर पालकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

सध्याच्या काळात इंग्रजी माध्यमाच्या वाढत्या प्रभावामुळे मराठी शाळांना काहीशी घरघर लागली आहे मात्र मातृभाषेतून घेतलेले शिक्षण हे मुलांच्या पायाभूत विकासासाठी सर्वात श्रेष्ठ आहे आपली मराठी शाळा टिकली पाहिजे आणि ती समृद्ध झाली पाहिजे यासाठी शासन स्तरावरून शाळा पूर्व तयारी मेळाव्यासारखे उपक्रम राबवले जात आहेत अशा उपक्रमामुळे पालकांचा कल पुन्हा जिल्हा परिषद शाळांकडे वाढत असून मराठी शाळा वाचवण्यासाठी अशा नाविन्यपूर्ण प्रयोगांची मोठी मदत होत आहे. आता जून महिन्यात शाळा सुरू झाल्यावर मेळावा क्रमांक दोन आयोजित केला जाणार असून त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या पुढील प्रगतीचा आढावा घेतला जाईल.

# विवाह सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन - भाऊसाहेब आजिनाथ गाडे सर

**दैनिक युवक आधार**

**आष्टी : प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे :** तालुक्यातील कुंभेफळ (ता. आष्टी, जि. बीड) येथील गाडे-पाटील परिवारातील चि. सौ. का. ऐश्वर्या आणि चि. धीरज यांचा शुभविवाह सोहळा उत्साहपूर्ण व मंगलमय वातावरणात संपन्न होत आहे. सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय असलेल्या या परिवाराच्या विवाह सोहळ्यामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

हा शुभविवाह शुक्रवार, दि. ८ मे २०२६ रोजी दुपारी १:४५ वाजता आयोजित करण्यात आला असून अहमदनगर येथील "निसर्ग लॉन्स, शेंडी बायपासजवळ, संभाजीनगर रोड" येथे हा सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहून वधू-वरांना आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन निमंत्रक श्री. भाऊसाहेब आजिनाथ गाडे (प्राथमिक शिक्षक) तसेच गाडे परिवार यांनी केले आहे.



वधू चि. सौ. का. ऐश्वर्या या सौ. योगिता व श्री. भाऊसाहेब आजिनाथ गाडे (रा. कुंभेफळ, ता. आष्टी, जि. बीड, सध्या अहिल्यानगर) यांची ज्येष्ठ कन्या असून त्या इंजिनिअर असून शैक्षणिक व संस्कारशील वातावरणात वाढलेल्या आहेत. वर चि. धीरज हे सौ. वंदना व श्री. संजय राजाराम काकडे (रा. कुंभेफळ, ता. आष्टी, जि. बीड, सध्या छत्रपती संभाजीनगर) यांचे सुपुत्र असून ते धर्मादाय आयुक्त कार्यालय बीड येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड होऊन नौकरी करत असून सुशिक्षित व संस्कारी,गुणी युवक म्हणून ओळखले जातात.

या विवाह सोहळ्याच्या पूर्वसंध्येला गुरुवार, दि. ७ मे २०२६ रोजी साखरपुडा व हळदीचा कार्यक्रम सायंकाळी ५.०० वाजता मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. या कार्यक्रमांनाही नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

गाडे-पाटील परिवार हा सामाजिक बांधिलकी जपणारा व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेला परिवार म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या विवाह सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, शिक्षकवर्ग, मित्रपरिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या मंगल प्रसंगी उपस्थित राहून नवदांपत्यास आशीर्वाद देऊन सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन समस्त गाडे-पाटील परिवार, नातेवाईक व आमंत्रकांनी केले आहे.

# गालसुरे येथे एकात्मतेचा संदेश देणारा स्तुत्य उपक्रम; सर्वत्र कौतुक

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** श्रीवर्धन तालुक्यातील गालसुरे येथे तक्षशिला बौद्ध विकास मंडळ (स्थानिक व मुंबई मंडळ) तसेच माता रमाई महिला मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने एक अत्यंत स्तुत्य आणि समाजप्रबोधनात्मक उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमातून सामाजिक एकात्मता, बंधुभाव आणि संविधान मूल्यांचा प्रभावी संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर लहान मुलांसाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी सादर केलेल्या कलागुणांना उपस्थितांकडून भरभरून दाद मिळाली. सहभागी मुलांना प्रोत्साहनपर भेटवस्तू देऊन त्यांचा उत्साह वाढविण्यात आला.

यावेळी परिसरातील विविध जाती-धर्मांतील मान्यवरांना भारतीय संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. यामागचा उद्देश म्हणजे संविधानातील समानता, बंधुता आणि न्याय या मूल्यांची जाणीव समाजात अधिक दृढ करणे हा होता.



कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांसाठी भोजनाचीही व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमामुळे गालसुरे परिसरात सामाजिक सलोखा आणि एकात्मतेचा संदेश अधिक दृढ झाला असून, या कार्यक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

हा उपक्रम समाजात सकारात्मक बदल घडविण्यासाठी प्रेरणादायी ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# किरसान इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये प्री-प्रायमरी विद्यार्थ्यांचा उत्साहात 'ग्रॅज्युएशन डे' साजरा

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड / गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** गणखैरा येथील सीबीएसई संलग्न किरसान इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये दिनांक 30 एप्रिल 2026 रोजी प्री-प्रायमरी विभागातील विद्यार्थ्यांसाठी "ग्रॅज्युएशन डे" अर्थात दीक्षांत समारंभाचे भव्य आणि उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. प्री-प्रायमरी शिक्षण पूर्ण करून पुढील इयत्तेत प्रवेश घेणाऱ्या लहानग्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला.




या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे कार्यकारी संचालक ॲड. दुष्यंत किरसान, शाळेच्या व्यवस्थापकीय संचालिका सीमा किरसान, प्राचार्य अनिल कुमार राव तसेच शिक्षिका नेहा चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली.

कार्यक्रमादरम्यान सीनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा "दीक्षांत समारंभ" अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. लहान विद्यार्थ्यांनी ग्रॅज्युएशन पोशाख परिधान करून मंचावर प्रवेश करत आपला आनंद व्यक्त केला. पालकांसाठी हा क्षण अभिमानाचा आणि अविस्मरणीय ठरला.

या प्रसंगी प्री-प्रायमरी विभागाला "किंडर वर्ल्ड" या नव्या नावाने सुरू करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन व्यवस्थापकीय संचालिका सीमा किरसान यांच्या हस्ते करण्यात आले. "किंडर वर्ल्ड"च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर अधिक भर देण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमाला पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रॅज्युएशन डे हा लहान मुलांच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा आणि आनंददायी टप्पा मानला जातो. या निमित्ताने विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, प्रगतीपत्रक आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनीही आपल्या भावना व्यक्त करत शाळेला भावनिक निरोप दिला आणि शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक सादरीकरणे करून उपस्थितांची मने जिंकली. नृत्य, गीते आणि लघुनाट्यांच्या माध्यमातून त्यांनी आपली कला सादर केली. या सादरीकरणांना पालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी प्रेरित करणे हा होता. पालकांनीही आपल्या मुलांच्या यशाचे मनापासून कौतुक करत शाळेच्या उपक्रमांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे प्राचार्य, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन माधुरी रहांगडाले यांनी केले.

एकूणच, किरसान इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमध्ये साजरा करण्यात आलेला "ग्रॅज्युएशन डे" हा विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि प्रेरणादायी ठरला असून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी नवी उमेद देणारा ठरला.

# दर्यापूर मतदारसंघात विकासकामांचा धडाका!

## आमदार गजाननभाऊ लवटे यांच्या हस्ते ₹५० लक्षांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन ; माटरगाव, गौरखेडा, चंडिकापूर, जसापुर गावांमध्ये आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** दर्यापूर तालुक्यातील माटरगाव, गौरखेडा, चंडिकापूर आणि जसापुर या गावांमध्ये आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या विविध विकासकामांच्या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्याचा उत्साहपूर्ण माहोलात शुभारंभ करण्यात आला. दर्यापूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार मा. गजाननभाऊ लवटे यांच्या हस्ते सुमारे ₹५० लक्ष निधीच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले.



या विकासकामांमध्ये ग्रामस्थांच्या अनेक वर्षांच्या मागण्यांना न्याय देणाऱ्या महत्त्वपूर्ण प्रकल्पांचा समावेश करण्यात आला आहे. माटरगाव येथे ग्रामपंचायतीच्या खुल्या जागेवर हनुमान मंदिरासमोरील सार्वजनिक सांस्कृतिक भवनाचे बांधकाम, गौरखेडा येथे संत नर्मदा माता मंदिर परिसरासमोरील सार्वजनिक रस्त्यावर पेव्हिंग ब्लॉक बसविण्याचे काम, चंडिकापूर येथे पाझर तलाव ते खल्लार रोडपर्यंत सिमेंट काँक्रीट रस्ता बांधकाम, तसेच जसापुर येथे ग्रामपंचायतीच्या जागेवर नवीन ग्रामपंचायत भवन उभारणी अशा विविध विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला.

या प्रसंगी बोलताना आमदार गजाननभाऊ लवटे यांनी, "ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय असून मतदारसंघातील प्रत्येक गावात मूलभूत सुविधा पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. विकासकामांमुळे गावांचा चेहरामोहरा बदलणार असून नागरिकांना दर्जेदार सुविधा उपलब्ध होतील," असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला मा. सुधाकर पाटील भारसाकळे (तालुकाध्यक्ष काँग्रेस कमिटी), मा. अंकुश पाटील कावडकर (जिल्हाप्रमुख युवासेना), मा. बबनराव विल्हेकर (विधानसभा संघटक शिवसेना), मा. गुणवंत पाटील गावंडे (तालुका संघटक शिवसेना), मा. प्रमोदभाऊ धानोकर (तालुका प्रमुख शिवसेना), मा. मोहनभाऊ बायस्कर (सरपंच नरसिंगपूर), मा. प्रतिकभाऊ राऊत (युवासेना जिल्हा चिटणीस), मा. दीपकभाऊ बगाडे (उपशहर प्रमुख शिवसेना) यांच्यासह शिवसेना, युवासेना, काँग्रेस कमिटी, महाविकास आघाडीचे आजी-माजी पदाधिकारी, विविध गावांतील सरपंच, उपसरपंच, सदस्य, शिवसैनिक व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.भूमिपूजन सोहळ्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून गावकऱ्यांनी आमदार गजाननभाऊ लवटे यांच्या विकासाभिमुख कार्याचे कौतुक व्यक्त केले.

# उरणमध्ये रंगला 'गुरुकुल बाल संस्कार शिबिरा'चा भावूक निरोप समारंभ!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी** : मुलांच्या निरागस चेहऱ्यावर झळकणारा आत्मविश्वास आणि त्यांच्या वाणीतून उमटणारे स्तोत्र-मंत्रांचे पवित्र सूर... अशा अत्यंत मांगल्यामय वातावरणात नागाव रोड येथील माऊली मंगल कार्यालयात १ मे रोजी 'गुरुकुल बाल संस्कार शिबिरा'चा निरोप समारंभ संपन्न झाला. १५ दिवसांपूर्वी सुरू झालेला हा संस्कारांचा प्रवास केवळ एक शिबिर न राहता, ४० चिमुरड्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा एक सोहळा ठरला.

या संपूर्ण शिबिराचा मुख्य आधारस्तंभ होत्या, नुकत्याच 'भारतरत्न गौरव श्री' पुरस्काराने सन्मानित झालेल्या प्रसिद्ध गायिका पूनम पाटेकर. गेल्या २वर्षांपासून बालसंस्कारांचे व्रत जोपासणाऱ्या पूनम मॅडम यांनी केवळ प्रशिक्षक म्हणून नव्हे, तर एका माऊलीच्या मायेने मुलांवर संस्कार केले. मुलांची बुद्धिमत्ता तल्लख व्हावी, त्यांची वाणी शुद्ध व्हावी आणि आधुनिक युगात वावरताना त्यांनी आपल्या भारतीय संस्कृतीची नाळ विसरू नये, यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत कार्यक्रमाच्या प्रत्येक क्षणी जाणवत होती. निरोप समारंभात त्यांनी पालकांशी संवाद साधताना "संस्कार हीच मुलांच्या भविष्याची खरी संपत्ती आहे," असे हृदयस्पर्शी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती वंदनेने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी जेव्हा शिबिरात



शिकलेली देशभक्तीपर गीते, मंत्र आणि नृत्याचे सादरीकरण केले, तेव्हा उपस्थित पालकांचे डोळे अभिमानाने भरून आले. मोबाईलच्या जगात हरवलेली मुले जेव्हा स्तोत्रपठण करू लागली तेव्हा कार्यक्रमात एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली. सामाजिक कार्यकर्त्या सानिका कदम आणि निसर्गोपचार तज्ज्ञ हेमा घरात यांच्या मोलाच्या सहकार्याने मुलांच्या व्यक्तिमत्वाला पैलू पडले.

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात पालकांनी आपले अनुभव मांडले आणि आमची मुले बदलले आहेत त्यांच्यातील शिस्त आणि आदर वाढला आहे अशा भावना पालकांनी व्यक्त केल्या श्री समर्थ सखी स्वयंसहायता संस्थेच्या अध्यक्षा संगीता ढेरे यांच्याकडून मिळालेल्या मायेच्या खाऊ आणि भेटवस्तूंनी मुलांचे चेहरे खुलले. जड अंतकरणाने पण समृद्ध आठवणी घेऊन मुलांनी या शिबिराचा निरोप घेतला सानिका कदम यांनी अत्यंत भावुक शब्दात सर्वांचे आभार मानले आणि या संस्काराच्या वाटेवर पुढे चालत राहण्याचा निर्धार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# चांदिवली संघर्ष नगरात वैशाख पौर्णिमा व २५७० वी बुद्ध जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी :** १ मे २०२६ जगाला शांती, करुणा आणि अहिंसेचा महान संदेश देणारे विश्ववंदनीय तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५७० व्या जयंतीनिमित्त चांदिवली, संघर्ष नगर (संकुल क्र. २०) येथील बोधिसत्व बुद्ध विहारामध्ये उत्साहपूर्ण वातावरणात बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. सकाळी बुद्ध पूजा व वंदना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. परिसरातील बुद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाचे आयोजन सिद्धार्थ म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आमदार दिलीप मामा लांडगे, स्थानिक नगरसेवक डॉ. रवींद्र म्हस्के, तसेच भारतीय बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य दामोधर गुरुजी उपस्थित होते.



याशिवाय सुनील मगरे, किशोर मोरे, आनंदराव जाधव, तसेच दैनिक 'अखंड झेप'चे मुंबई प्रतिनिधी नानासाहेब डी. खैरे उपस्थित होते.

महिला सहभाग देखील मोठ्या प्रमाणावर दिसून आला. रुख्मिणी खरात, वंदना पाडमुख, अनुसया म्हस्के, कांताबाई जाधव, यादव मॅडम, सुप्रिया गायकवाड, रणदिवे मॅडम तसेच रमाई महिला मंडळाच्या महिला कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात दामोधर गुरुजी यांच्या हस्ते सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण करून करण्यात आली. त्यानंतर विविध मान्यवरांनी बुद्ध जयंतीचे महत्त्व अधोरेखित करत मार्गदर्शन केले. प्रबोधनात्मक गीतांनी वातावरण प्रेरणादायी झाले.

आपल्या भाषणात आमदार दिलीप मामा लांडगे यांनी "मी आज जो काही आहे, तो तुमच्या सहकार्यामुळेच आहे," असे नमूद करत जनतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. त्यांनी बुद्ध विहार हे पवित्र स्थान असल्याचे सांगत येथे कोणत्याही प्रकारचे राजकारण होऊ नये, असे स्पष्टपणे सांगितले. तसेच सिद्धार्थ म्हस्के यांच्या शिफारसीनुसार संकुल क्र. २० येथील पाण्याच्या टाकीला संरक्षण जाळी बसविण्याचा शब्द दिला.

स्थानिक नगरसेवक डॉ. रवींद्र म्हस्के यांनी बुद्ध जयंतीच्या शुभेच्छा देत सामाजिक ऐक्य आणि विकासासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. सिद्धार्थ म्हस्के यांनी आमदार दिलीप मामा लांडगे यांच्या कार्याचे कौतुक करत त्यांचे आभार मानले.

वैशाख पौर्णिमेनिमित्त धम्म बांधव रुपाजी केशवे यांनी आपल्या कमाईतून खीरदानाचे आयोजन केले होते. महिलांनीही परिश्रमपूर्वक खीर तयार करून या उपक्रमात मोलाचा वाटा उचलला. उपस्थितांनी खीरचा आस्वाद घेत समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमादरम्यान नववधू-वर (वकील) जोडप्याचा गुलाबाचे फूल देऊन सन्मान करण्यात आला व त्यांच्या पुढील आयुष्यासाठी मंगलमय शुभेच्छा देण्यात आल्या. सिद्धार्थ म्हस्के यांनीही या जोडप्याला उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिद्धार्थ म्हस्के यांनी प्रभावीपणे केले. नानासाहेब डी. खैरे, किशोर मोरे आणि वंदना पाडमुख यांनी जनजागृतीपर भीमगीत सादर करून उपस्थितांना प्रेरित केले.

सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचे दर्शन घडविणारा हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी ठरला. आयोजक सिद्धार्थ म्हस्के यांच्या उत्कृष्ट नियोजनामुळे उपस्थितांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले.

कार्यक्रमाची सांगता तथागतांना नतमस्तक होत शांती, करुणा आणि प्रेमाचा संदेश देत करण्यात आली.

# समर्थ विद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया / भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : समर्थ विद्यालय लाखनी येथे आज उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उदय राजहंस तसेच संस्था सदस्य सुरेश कापगते उपस्थित होते. दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा शंभर टक्के निकालाची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम ठेवली. विज्ञान विभागातून कु. पूर्वा शेखर वंजारी 78.83%, कु. निधी दिगंबर गरपडे 77.83%, कु.जागृती विकास निर्वाण 77.33%, ह्या तीनही विद्यार्थिनी प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या .तसेच व्होकेशनल विभाग प्रथम अभिषेक देवदास वंजारी



61.60%, द्वितीय मेहरोश मिजबा सादिक मीठापाणी 60 % .व तृतीय हितेश शेंडे असे असून त्यांचा निकाल 75% टक्के लागला.याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व पेढे देऊन , गौरव करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले . संस्थेचे अध्यक्ष डॉ .उदय राजहंस यांनी आजकालच्या विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच करिअरबद्दल जागरूकता असते तसेच तुम्हाला पण असावी आणि तुम्ही यापेक्षा अधिक अभ्यास करावा हे सांगितले. तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती विभावरी निखाडे यांनी अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांनी मेहनत करून यश मिळवलेले आहे आणि विद्यालयाचा निकाल दरवर्षीप्रमाणे यावर्षी शंभर टक्के लागलेला आहे ही गोष्ट आमच्यासाठी अभिमानाची आहे तसेच विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी अधिक मेहनत करावी हे सांगितले. विद्यालयाचे पर्यवेक्षक अनिल बावनकुळे, इयत्ता बारावीचे वर्गशिक्षक श्री .श्रीकृष्ण पटले, एमसीवीसी चे बारावीचे वर्गशिक्षक श्री कारवट तसेच सर्व शिक्षक बंधू भगिनी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सौ गायत्री विवेक भुसारी यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे उपाध्यक्ष शिवलाल रहांगडाले, कार्यवाह ॲड .होमेश्वर रोकडे ,लाखनी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेश वंजारी, भंडारा जिल्हा विजुक्ता कार्यवाह प्राध्यापक अशोक गायधनी, सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद रामटेके, सेवानिवृत्त प्राचार्य गोपालकृष्ण गिऱ्हेपुंजे, प्रा. धनंजय गिऱ्हेपूजे यांनी केले आहे.

# स्व. एन.पी.डब्ल्यू. ज्युनिअर कॉलेजची यशाची परंपरा कायम

## कला शाखेत अवनी टिचकुले तालुक्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी :** इयत्ता बारावीच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात लाखनी येथील स्व. एन.पी.डब्ल्यू. ज्युनिअर कॉलेजने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा यंदाही कायम राखली आहे. कला आणि विज्ञान या दोन्ही शाखांमध्ये महाविद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत परिसरात कौतुकाची लाट निर्माण केली आहे.

कला शाखेत अवनी विलास टिचकुले हिने ८६.५० टक्के गुण मिळवत लाखनी तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. तिच्यानंतर रमादेवी भास्कर हारोडे (७५%) हिने



द्वितीय, तर समीक्षा गजानन उकेतोयने (५७.८३%) हिने तृतीय क्रमांक मिळवला. विशेष म्हणजे, मागील वर्षीही याच महाविद्यालयातील विद्यार्थिनीने कला शाखेत तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला होता, आणि यंदा अवनीने ती परंपरा यशस्वीपणे पुढे नेली आहे.

विज्ञान शाखेत अमृता मोहन फेंडर हिने ७७.८३% गुणांसह महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. दिव्यांशू बळवंत वंजारी (७५%) द्वितीय, तर दुर्गेश योगेश्वर क्षीरसागर (७४.८३%) तृतीय क्रमांकावर राहिला.

या यशस्वी विद्यार्थ्यांच्या गौरवासाठी महाविद्यालयात विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी संस्थेच्या अध्यक्षा सरोज वाघाये, सचिव सुधीर कुकडे, प्राचार्य डॉ. गणेश कापसे तसेच प्रा. मनिषा सपाटे, प्रा. मंगेश कुकडे, प्रा. मुनेश्वर हलमारे, प्रा. कैवल्यदास सूर्यवंशी आणि प्रा. स्मिता तितरमारे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचेही विशेष कौतुक केले. महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण यशामुळे परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

दरम्यान, कला शाखेत प्रथम आलेली अवनी टिचकुले हिला पुढे कायद्याचे शिक्षण घेऊन विधी क्षेत्रात कार्य करण्याची इच्छा आहे, तर विज्ञान शाखेत प्रथम आलेली अमृता फेंडर हिने कृषी क्षेत्रात करिअर घडवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# आरपीआय मध्ये प्रा. जीवन जाधव यांची प्रदेश सचिवपदी, तर डॉ. रश्मी जाधव यांची मुंबई उपाध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मध्ये प्रा. जीवन जाधव आणि त्यांची कन्या डॉ. रश्मी जीवन जाधव यांची महत्त्वपूर्ण पदांवर नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी ही घोषणा केली.

यानुसार, प्रा. जीवन जाधव यांची महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीमध्ये प्रदेश सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, डॉ. रश्मी जीवन जाधव यांची मुंबई प्रदेश उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे.



प्रा. जाधव आणि डॉ. रश्मी जाधव हे यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार गट) पदाधिकारी होते. मात्र, पक्षात अन्याय झाल्याची भावना असल्याने त्यांनी मागील महिन्यात आरपीआय मध्ये प्रवेश केला होता. विशेषतः डॉ. रश्मी जाधव यांना मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी न मिळाल्याने नाराजी निर्माण झाली होती.

आरपीआय मध्ये प्रवेशावेळी रामदास आठवले यांनी त्यांचे खुलेपणाने स्वागत करत विक्रोळीतील पँथर चळवळीचा इतिहासही उजळवला होता. "एक पँथर पुन्हा पक्षात परतला," असे तेव्हा त्यांनी नमूद केले होते.डॉ. रश्मी जाधव या समाजकार्यामध्ये सक्रिय असून, त्या ज्येष्ठ नागरिक, पोलीस कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी तसेच महिलांसाठी नियमित आरोग्य शिबिरे आयोजित करतात.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ रोजी बाबासाहेब आंबेडकर यांनी केली होती. त्यांच्या विचारांवर आधारित पक्ष अधिक बळकट करण्यासाठी तरुणांनी मोठ्या प्रमाणावर सहभागी व्हावे, असे आवाहन प्रा. जीवन जाधव यांनी केले आहे.

या नियुक्तीनंतर पक्षातील अनेक नेत्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. यामध्ये सीमाताई आठवले, राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, उषाताई रामलू, श्रीकांत भालेराव, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष राजा सरोदे, सरचिटणीस गौतम सोनवणे तसेच मुंबई प्रदेशाध्यक्ष सिद्धार्थ कासारे यांचा समावेश आहे.पक्षवाढीसाठी आपण कटिबद्ध असल्याचे प्रा. जीवन जाधव यांनी स्पष्ट केले.

# करंजी येथे द्वितीय तुकोजीराव होळकर यांचा १९१ वा जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**

**राहुल कुलकर्णी** : निफाड तालुक्यातील करंजी येथे जन्म घेऊन इंदोरच्या होळकरी गादीवर राज्य करणारे आणि आधुनिक इंदोर शहराचा पाया रचणारे तुकोजीराव होळकर द्वितीय यांचा १९१ वा जन्मोत्सव सोहळा करंजी येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला होळकर घराण्याचे वंशज अभिमन्यूराजे होळकर व मुकुंदराजे होळकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



करंजी ग्रामस्थ तसेच 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सार्वजनिक जन्मोत्सव सोहळा समिती, नाशिक' यांच्या संयुक्त विद्यमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. गावाच्या वेशीवर तांबडे कुटुंबीयांनी होळकर वंशजांच्या ताफ्याचे पारंपरिक पद्धतीने स्वागत केले.

कार्यक्रमाची सुरुवात मल्हार तुकेश्वर महादेव मंदिरात अभिमन्यूराजे होळकर यांच्या हस्ते अभिषेक करून करण्यात आली. यानंतर होळकर शाही अभ्यासक व व्याख्याते रामदास काळे यांनी तुकोजीराव होळकर द्वितीय यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांच्या प्रशासनकौशल्य, दूरदृष्टी आणि इंदोरच्या विकासातील योगदानाची सविस्तर माहिती दिली.

यावेळी ग्रामस्थांनी करंजी येथे तुकोजीराव होळकर यांचे स्मारक उभारणे तसेच यात्रेनिमित्त आवश्यक मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी मागणी होळकर वंशजांकडे केली.

या सोहळ्यास आमय फडणीस, नवनाथ ढगे, समाधान बागल, सरपंच चित्रा तांबेकर, उपसरपंच सविता आडसरे, सुरेश आडसरे, राजेंद्र निंबाळकर, शरद जोशी, काळू बोराडे, योगेश आडसरे, प्रकाश आडसरे, भास्कर तांबडे यांच्यासह ग्रामस्थ व मोठ्या संख्येने तरुण वर्ग उपस्थित होता.

# जंगलराजचा अंत आणि राष्ट्रवादी प्रशासनाची स्थापना : जनमताचा विजय"

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर** :आज एक विलक्षण सुवर्णयोग जुळून आला आहे. संपूर्ण देश 'वंदे मातरम' या राष्ट्रभक्तीपर गीताचे १५० वे वर्ष साजरे करत असताना, याच गीताचे जनक महान साहित्यकार बंकिमचंद्र यांच्या बंगालमध्ये 'वंदे मातरम'चा खऱ्या अर्थाने उद्घोष करणाऱ्यांच्या हातात जनतेने सत्ता सोपवली आहे.



बंगालमधील ममताचा 'जंगलराज' आता संपुष्टात येत असून, भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून तिथे एका कणखर राष्ट्रवादी प्रशासनाची स्थापना होत आहे. तामिळनाडूमध्ये सनातन परंपरेचा अपमान करणाऱ्या व सत्तेचा वापर करणाऱ्यांना जनतेने सपशेल नाकारले आहे, तर आसाममध्ये विकासकामांवर विश्वास ठेवून जनतेने पुन्हा एकदा भाजपला कौल दिला आहे. आम्ही जनतेने दिलेल्या या महान जनमताचा पूर्णतः सन्मान करतो. 'जनता जनार्दन' नेहमीच विकासाला आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देते. या निकालांवरून हे स्पष्ट झाले आहे. सामान्य नागरिक विकासाच्या राजकारणासोबत आणि राष्ट्रवादी विचारांच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभा आहे.